www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज


# दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 187 वा  रविवार दि. 23 मार्च २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ४  RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

# सुशांत सिंह राजपूत मृत्यू प्रकरणी सीबीआयचा क्लोजर रिपोर्ट; मृत्यूमागे कारण काय?



**मुंबई -** अभिनेता सुशांत सिंह राजपूत मृत्यू प्रकरणी सीबीआयनं मुंबईच्या कोर्टात क्लोजर रिपोर्ट सादर केला आहे. २०२० साली सुशांत सिंह राजपूतचा त्याच्या राहत्या घरी संशयास्पद मृत्यू झाला होता. मुंबईतील फ्लॅटमध्ये सुशांत सिंहने आत्महत्या केल्याचं समोर आले. मात्र त्याच्या मृत्यूवर अनेकांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. कुटुंबानेही त्याच्या मृत्यूची चौकशी सीबीआयकडे द्यावी अशी मागणी केली होती. त्यानंतर सरकारने या प्रकरणाचा तपास सीबीआयला सोपवला होता.

सूत्रांनुसार, अभिनेता सुशांत सिंह राजपूत मृत्यू प्रकरणी कुठलेही ठोस पुरावे मिळाले नाहीत त्यामुळे हे प्रकरण बंद करण्यात यावं असं कोर्टाला रिपोर्ट दिला आहे. ज्यावेळी ही घटना घडली तेव्हा त्याच्या मृत्यूवर कुटुंबाने प्रश्न उपस्थित केले होते. सुशांत जीव देऊ शकत नाही यामागे नक्कीच काहीतरी षडयंत्र आहे असा दावा कुटुंबाने केला होता. मात्र यावर सीबीआयने क्लोजर रिपोर्ट कोर्टात सादर केला आहे. त्यामुळे हा क्लोजर रिपोर्ट स्वीकारून प्रकरण बंद करावे की तपास यंत्रणाचे पुढे चौकशीचे आदेश द्यावेत हे कोर्ट ठरवणार आहे.

१४ जून २०२० मध्ये सुशांत सिंह राजपूतचा मृत्यू झाला होता. त्यानंतर ४ वर्ष ४ महिन्यांनी सीबीआयने क्लोजर रिपोर्ट दाखल केला आहे. विशेष म्हणजे या क्लोजर रिपोर्टमध्ये अभिनेत्री रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबाला क्लीन चीट दिल्याचं माध्यमांनी वृत्त दिले आहे. सुशांतच्या कुटुंबाने रिया चक्रवर्ती हिच्यावर आरोप लावले होते मात्र त्यात पुरावे आढळले नाहीत.

दरम्यान, सुशांत सिंह राजपूत कुटुंबाकडे आता प्रोटेस्ट पिटिशन मुंबई कोर्टात दाखल करण्याचा पर्याय आहे. सीबीआयने एम्स एक्सपर्टकडून सुशांत राजपूत आत्महत्येची चौकशी केली होती. यात एम्सच्या फॉरेन्सिक टीमनेही काही गडबड नसल्याचं म्हटलं होते. रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबाने सुशांत सिंह राजपूतच्या पैशाचा गैरवापर केल्याचा आरोप सुशांतच्या कुटुंबाने केला होता. परंतु एका मुलाखतीत रियाने ते आरोप फेटाळले होते.

**CBI च्या रिपोर्टमध्ये काय?**

सुशांत सिंह राजपूतने आत्महत्या केली होती, कुणाचाही दबाव नव्हता

रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबाला क्लीन चीट

मृत्यूमागे कुठलेही षडयंत्र आढळून आले नाही

एम्सच्या फॉरेन्सिक टीमनेही हत्येची शक्यता फेटाळली

सोशल मिडिया चॅट्स अमेरिकेला पाठवून पडताळले, त्यातही छेडछाड केल्याचा पुरावा नाही

## द•ख•ल

### मेहतर वाल्मिकी महासंघाच्या वतीने पुणे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन,



मेहतर वाल्मिकी समाजाच्या मालेगाव नगरपालिका शासकीय चतुर्थ श्रेणी कर्मचारी अजय श्रावण चांगरे यांना काही समाजकंटकांनी मारहाण करून करून जातीवाचक शब्द वापरून अश्लील शिवीगाळ करणाऱ्या अशा समाजकंटकांना अट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा व्हावी, व या घटनेचा मेहतर वाल्मिकी महासंघ पुणे शहराच्या वतीने जाहीर निषेध करून या संदर्भाची निवेदन पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना मेहतर वाल्मिकी समाज पुणे शहराच्या वतीने देण्यात आले होते,

यावेळी मेहतर वाल्मिकी महासंघाचे पुणे शहर अध्यक्ष रवी परदेशी, महासचिव नरेंद्र इंद्रसेन जाधव, दिनेश अर्धाळकर, सचिन निंदाणे, सचिन सारवान, कनव चव्हाण, सुनील पिलाव, महेंद्र लालबिगे, सुनील कोटीयाना, रामलाल जाधव, बाबूजी बेद, सूरदास चव्हाण, विजू चंडालिया, आदि यावेळी उपस्थित होते

### प्रितेश हरिप्रसाद साहू यांची युवक काँग्रेसचे प्रदेश, महासचिव पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत यांच्या नेतृत्वाखाली लाल महल, पुणे ते मुंबई विधानभवनाकडे निघालेल्या 'युवा आक्रोश' पदयायात्रा युवकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

ही पदयात्रा महाराष्ट्रातील युवकांचे प्रश्न, महिलांच्या सुरक्षेच्या मागण्या, शेतकऱ्यांच्या समस्या, सामाजिक शांतता आणि यांसारख्या महत्वाच्या विषयांवर सरकारला जाग आणण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. बेरोजगारीने त्रस्त असलेल्या तरुणांना न्याय मिळावा, महिलांना सुरक्षित वाटावे, शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचे योग्य मूल्यमापन मिळावे, तसेच राज्यात सामाजिक एकता आणि शांततेसाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, या प्रमुख मागण्यांसाठी युवक काँग्रेसने ही पदयात्रा काढून सरकारला जाग आणली. तर विधानसभा निवडणुकी हतबल झालेल्या युवकांना कामं करण्याची नवीन संधी मिळावी पक्ष वाढीसाठी नवीन संजीवनी मिळावी यासाठी युवक काँग्रेस मध्ये पदोन्नती करत महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कुणाल राऊत यांनी युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी, पक्ष वाढीसाठी .प्रितेश हरिप्रसाद साहू यांची युवक काँग्रेसचे प्रदेश, महासचिव पदी निवड करण्यात आली.

# सरगम लायन्सची कराओके स्पर्धा प्राथमिक फेरी संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे आयोजित लायन्स सरगम कराओके स्टार 2025 या कराओके गायन स्पर्धेची प्राथमिक फेरी नुकतीच गोखले सभागृह पनवेल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन मल्टिपल काऊन्सिल चेअरमन ए के शर्मा यांनी केले. या वेळी ए के शर्मा यांनी सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या तसेच सरगम क्लबच्या मानदा पंडित, स्वाती गोडसे आणि संजय गोडसे तसेच परीक्षक सतीश मोरे आणि ॲड. सुरेखा भुजबळ यांना सन्मानित केले. या स्पर्धेमध्ये 90 पेक्षा जास्त स्पर्धकांनी भाग घेऊन प्रचंड प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे हे स्पर्धक, पनवेल, पेण, अलिबाग, मुरुड, माणगाव, ठाणे, भिवंडी, मुंबई अशा विविध भागातून आले होते. या स्पर्धा 5 गटात घेण्यात आल्या. अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या स्पर्धकांची आता रविवार दि. 23 मार्च रोजी गोखले हॉल, पनवेल येथे अंतिम फेरी घेण्यात येईल. भाग




घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना सरगम क्लबतर्फे चिमण्या वाचवा मोहिमेंतर्गत चिमणीचे घरटे भेट देण्यात आले. या स्पर्धांसाठी परीक्षक म्हणुन सतीश मोरे आणि ॲड. सुरेखा भुजबळ यांनी काम पाहिले. अध्यक्ष मानदा पंडित यांनी सर्वांचे स्वागत केले तर सचिव प्रेमेंद्र बहिरा यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गोडसे यांनी केले. या प्रसंगी ला. आशा शर्मा, ए एस एन मूर्ती, मदन गोवारी आदि मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्वाती गोडसे, अल्केश शहा, धवल शहा, ओमकार खेडकर, आदित्य दोशी, सुषमा पन्हाळे, अश्विनी खेडकर तसेच सुयोग पेंडसे आणि सुरभी पेंडसे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# सणसर ग्रामदैवत भैरवनाथ मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**
सणसर ता. इंदापूर येथील ग्रामदैवत व कुलदैवत म्हणून प्रसिद्ध असलेले श्रद्धास्थान भैरवनाथ मंदिर येथे शनिवार २२ मार्च २०२५ सणसर ग्रामस्थ यांचे श्रद्धास्थान ग्रामदैवत श्री.भैरवनाथ महाराज व माता जोगेश्वरी यांचा ९ वा मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला,या सोहळ्या निमित्त पहाटे अभिषेक होऊन सकाळी महाआरती पार पडली सकाळी १० ते१२ या दरम्यान सोहळ्या निमित्त प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प.सुरेश महाराज यादव मिरढे यांचे सुश्राव्य किर्तन सेवा पार पडली व त्यांना सणसर भजनी मंडळाने उत्स्फूर्त पणे साथ दिली.दुपारी सर्व भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले, सणसरमधील सर्व ग्रामस्थ यात्रा कमिटी व तरुणांनी जबाबदारी ने सोहळा यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले हा सोहळा अतिशय भक्तिमय वातावरणात व आनंदात साजरा करण्यात
आला.संध्याकाळी ६वा गोंधळ व भैरवनाथ कथा हा कार्यक्रम संप्पन्न होऊन वर्धापन दिन साजरा करण्यात आला.



# भारतीय विद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेत निफाड कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयास गोल्ड मेडल

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**
निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयास अखिल भारतीय विद्यापीठ राष्ट्रीय स्तराच्या कायकिंग, कानोयिंग आणि ड्रॅगन बोट या बोटिंगच्या स्पर्धा दिनांक 13 ते 18 मार्च 2025 रोजी मोहली, पंजाब येथे नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील निफाड बोट-क्लबचे खेळाडू कु. प्रथमेश शिंदे (एस वाय बी ए) कु. भूषण आव्हाड (टी वाय बी ए) या खेळाडूंनी ड्रॅगन बोट या स्पर्धा प्रकारात *अनुक्रमे गोल्ड मेडल व सिल्वर मेडल पटकावत नेत्रदीपक असे घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेचे वेगळेपण व विशेष म्हणजे भारतातील तमिळनाडू, पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र, केरळ, उत्तर प्रदेश, कर्नाटक या, व अशा विविध राज्यातील सर्व विद्यापीठातील खेळाडूंनी बोटिंग स्पर्धा प्रकरात सहभाग नोंदविला होता. निफाड बोट क्लब च्या यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षक चंद्रशेखर मोरे, चेतन कुंदे, प्रवीण शेळके यांचे मार्गदर्शन लाभले






**त्याच्या या यशाबद्दल**
म.वि.प्र.समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष श्री विश्वासराव मोरे, सरचिटणीस अड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी आप्पा गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई बोरस्ते, तसेच निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव, सर्व प्राध्यापक वृंद आणि आप्तेष्ट नातेवाईक, निफाड ग्रामस्थ यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# देशातील पहिली ई-वॉटर टॅक्सी गेटवे ऑफ इंडिया (मुंबई)ते अलिबाग व एलिफंटा धावणार

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
पर्यटकांची व मुंबईकरांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे माफक दर ठेवावेत, असे राज्य शासनाने स्वीडीश कंपनीला सांगितले.मुंबईकरांची वाहतूक कोंडीतून सुटका होणारवॉटर टॅक्सीचे दर किती असणार त्याचा खुलासा अजून झालेला नाही.ई वॉटर टॅक्सीच्या परवान्याबाबत राज्य शासन दक्षता घेईल, असे आश्वासन मंत्री नितेश राणे यांनी या बैठकीत दिले.Mumbai: मुंबईकरांची ई-वॉटर टॅक्सीबाबतची उत्सुकता संपणार आहे. देशातील पहिली ई-वॉटर टॅक्सी मुंबईत धावणार आहे. स्वीडनची कँडेला कंपनी पर्यावरणपूरक वॉटर टॅक्सीचा पायलट प्रोजेक्ट राबवून ही सेवा त्वरित सुरू करण्याचे सांगितले आहे. या निर्णयामुळे मुंबईतील वाहतूक कोंडीत अडकणाऱ्या मुंबईकरांना आणखी एक प्रवासाचा पर्याय मिळणार आहेपायलट प्रोजेक्ट असा असणारराज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी स्वीडनचे महावाणिज्य दूत स्वेन ओस्टबर्ग यांच्यात मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत ई-वॉटर टॅक्सी सुरु करण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला. गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा आणि गेट वे ऑफ इंडिया ते अलिबाग या जलवाहतूक मार्गावर ई-वॉटर टॅक्सी सुरु होणार आहे. या ई-वॉटर टॅक्सी प्रकल्पामुळे मुंबईतील वाहतूक कोंडीत अडकणाऱ्यांना आणखी एक पर्याय मिळणार आहे.वॉटर टॅक्सीचे दर किती असणार वॉटर टॅक्सीचे दर किती असणार त्याचा खुलासा अजून झालेला नाही. परंतु सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे माफक दर ठेवावेत, असे राज्य शासनाने स्वीडीश कंपनीला सांगितले आहे. तसेच ई वॉटर टॅक्सीच्या परवान्याबाबत राज्य शासन दक्षता घेईल, असे आश्वासन मंत्री नितेश राणे यांनी या बैठकीत दिले. मुंबईत सुरु होणाऱ्या इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीमधून २५ प्रवाशी प्रवास करू शकतात. यामध्ये ६४ किलोवॅटची बॅटरी असणार आहे.




# श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान (मायंबा) सावरगांव संजीवन समाधी महोत्सव

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**
आष्टी तालुक्यातील सावरगाव येथे मच्छिंद्रनाथाची समाधी आहे या ठिकाणी दरवर्षी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान मायंबा सावरगाव संजीवनी समाधी महोत्सव संपन्न होतो. या कालावधीमध्ये देशभरातून श्री मच्छिंद्रनाथाचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्त येत असतात श्री मच्छिंद्रनाथ संजीवनी समाधी महोत्सव 2025 दिनांक 29 ते 30 मार्च यादरम्यान संपन्न होत आहे. यादरम्यान खालील प्रमाणे श्री मच्छिंद्रनाथ गडावर कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले आहे. २५ मार्च २०२५ सकाळी ७ वा. श्री मच्छिंद्रनाथ गडावरून निशाण पैठणकडे प्रस्थान होणार आहे २७ मार्च २०२५ सकाळी ८ वा. पैठण येथे निशाण मिरवणूक संपन्न होणार आहे.२९ मार्च २०२५ सकाळी ११ वा श्री मच्छिंद्रनाथ गडावर कावडीचे आगमन. २९ मार्च २०२५ दुपारी १२ वा. महाआरती दुपारी १.३० वा. ते सायं. ४ वा. पर्यंत नाथभक्तांनी कावडीने पैठण, काशी व इतर तीर्थ क्षेत्र ठिकाणावरून आणलेल्या पवित्र गंगाजलाने समाधीस जलाभिषेक. करण्यात येणार आहे. २९ मार्च २०२५ सायं. ४ वा. ते ३० मार्च २०२५ पहाटे ५.३० वा. पर्यंत श्री मच्छिंद्रनाथ समाधीस उटणे, सुगंधी मसाले, चंदन उटी लेप लावणे कार्यक्रम. ३० मार्च २०२५ पहाटे ५.३० वा. श्री मच्छिंद्रनाथ समाधीची विधीवत महापूजा.३० मार्च २०२५ पहाटे ६ वा. महाआरती व त्यानंतर नियमित दर्शन श्री मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्ट, श्री क्षेत्र मायंबा, विश्वस्त मंडळातर्फे सर्व नाथभक्तांना विनंती करण्यात येते की, समाधी महोत्सव २०२५ मध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊनॐ चैतन्य श्री मच्छिंद्रनाथ महाराजांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा.

**टिप :** फक्त कावड धारकांनीच पैठण, काशी व इतर तीर्थक्षेत्राहून आणलेल्या पाण्याने समाधीस स्नान घालणे.(प्लॅस्टिक कॅन, मिनरल वॉटर बाटलीतील पाणी आणू नये). कृपया भाविकानी रांगेत शांततेत दर्शन घ्यावे, इतर भाविकांना त्रास होईल असे गैरवर्तन करू नये. मंदिर परिसरात धुम्रपान करू नये. खिसे कापू व चोरांपासून सावध रहा. मसाला लावणाऱ्या भाविक - नाथभक्तांनी दि. २९/३/२०२५, सांय. ५ नंतरच रांगेत यावे.

नाथ समाधी मुख्य मंदिराचे जिर्णोद्धाराचे काम प्रगतीपथावर चालू आहे.

व्हीआयपी पास ₹१०००/- राहील.

मंदिर जिर्णोद्धारासाठी सढळ हाताने मदत आव्हान

श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान ( मायंबा) सावरगांव, ता. आष्टी, जि. बीड. अध्यक्ष उपाध्यक्ष, सचिव, सर्व विश्वस्त व समस्त ग्रामस्थ सावरगांव, शेंडगेवाडी यांच्यावतीने करण्यात आलेले आहे

**जाहिर सूचना :** दि. २९ मार्च रोजी सायं. ४ वा. पर्यंतच समाधीला पाणी घातले जाईल. ४ वा. नंतर "आलेल्या कावडधारकाचा विचार केला जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.




# कळंबोली येथील आरटीओ कार्यालय लवकरच खारघरमध्ये

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजाराच्या इमारतीमध्ये पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे (आर.टी.ओ.) कार्यालय सुरू आहे. हे कार्यालय काही दिवसांत स्थलांतरित होऊन खारघर येथील सेक्टर 36 मधील व्हॅलीशिल्प सोसायटीच्या आठ गाळ्यांमध्ये सुरू होणार आहे. याबाबतच्या प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरीचे आदेश राज्याच्या गृहविभागाने जाहीर केले. एप्रिल महिन्यात पनवेल आरटीओ कार्यालय खारघर येथे प्रत्यक्षात स्थलांतरीत होईल असे संकेत मिळत आहेत. कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजार समितीच्या सामायिक इमारतीमध्ये मागील 14 वर्षांपासून आरटीओ कार्यालयाचा कारभार सुरू आहे. मात्र लोखंड पोलाद बाजार समितीची सामायिक इमारत पनवेल महापालिकेने धोकादायक घोषित केली होती. धोकादायक इमारतीमधून कामकाज सुरू असल्याने येथील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी या इमारतीमधील अनेक सरकारी कार्यालये हलविण्यात आली. पनवेल आरटीओ कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पनवेल तहसिलदार, पनवेल महानगरपालिका आणि सिडको मंडळाकडे जागेची मागणी करण्यात आली होती. सिडको मंडळाने आरटीओच्या मागणीला प्रतिसाद देत खारघर उपनगरातील सेक्टर 36 येथील व्हॅली शिल्प को.ऑ.हौ.सोसायटीमधील इमारतीत जागा भाडेतत्वाने देण्याचा निर्णय घेतला. 11 महिन्यांचे भाडे 46,64,734.35 रुपये आहे. यापैकी तीन महिन्यांचे भाडे आणि कागदपत्रांची रक्कम सिडकोला आगाऊ द्यावी लागणार आहे. पुढील आठवड्यात सोमवार ते मंगळवारी आरटीओ कार्यालयाकडून सिडको मंडळाला भाड्याच्या रकमेचा धनादेश दिल्यानंतर भाडेकरार झाल्यावर आरटीओच्या ताब्यात हे गाळे येतील. त्यामुळे एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात कार्यालयाचे स्थलांतर सुरू होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**हक्काचे कार्यालय कधी?**

पनवेल आरटीओ कार्यालयासाठी सिडको मंडळाने तळोजा मजकूर येथील पावणेतीन एकर क्षेत्राचा भूखंड दिला आहे. आरटीओ कार्यालयाने या जागेच्या मोबदल्यात विकास शुल्क देखील सिडको मंडळाकडे डिसेंबर महिन्यात जमा केले आहे. परंतु प्रत्यक्षात जागेवर विकसित भूखंडाऐवजी ती जागा उंचसखल आणि त्या जागेतील मोठा भागाला तलावाचे रुप आल्यामुळे सिडको मंडळाने हा भूखंड व्यवस्थित विकसित करुन देण्याची विनंती आरटीओने सिडकोकडे केली आहे. सिडकोने विकसित भूखंड दिल्यावर पनवेल आरटीओ कार्यालय हक्काच्या जागेत उभारण्याच्या कामाला वेग येईल.

# संपादकीय

## २३ मार्च जागतिक हवामान दीन

विषय:- बदलते हवामान संपूर्ण सृष्टीसाठी चिंताजनक.


जगातील भयावह घटना पहाता बदलत्या हवामानावर नियंत्रण ठेवणे काळाची गरज.जगात महाप्रलय,भुकंप, सुनामी,वनवे लागणे, ज्वालामुखीचा उद्रेक,अवकाळी पाऊस,अती उष्णता,अती थंडी, ग्लेशियर वितळणे, समुद्राची पातळी वाढने किंवा येणाऱ्या नैसर्गिक आपदा याची सुचना यावर नियंत्रण कसे ठेवता येईल व येणाऱ्या नैसर्गिक आपदांची माहिती कशी मिळु शकेल याउद्देश २३ मार्च १९५० ला जागतिक हवामान संस्थेची स्थापना करण्यात आली. यापुर्वी १९२२ ला हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी हवामानाच्या अंदाजाचा शोध लावुन हवामान पहाण्याकरीता सांख्यिकी पध्दत शोधून त्यानुसार काही प्रमाणात हवामान अंदाज वर्तविता येऊ लागले व हवामानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम केले. हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी लावलेला शोध आज जगाला अत्यंत कारगर आणि गुणकारी सिध्द झाल्याचे आपण पहातो. त्याच अनुषंगाने १९५० ला जागतिक हवामान संस्थेची (डब्लुएमओ) स्थापना करण्यात आली या संस्थेचे मुख्यालय स्वित्झर्लंड येथील जिनेव्हा येथे आहे.यानंतर (डब्लुएमओ) संयुक्त राष्ट्राची (युएन) विषेश संस्था बनली. पहिला जागतिक हवामान दिवस २३ मार्च १९६१ रोजी साजरा करण्यात आला.त्यावेळी ३१ सदस्य देश होते आता या आंतरराष्ट्रीय संघटनेचे १९३ देशांपेक्षा जास्त सदस्य आहेत. पर्यावरणातील वाढते बदल याबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या अनुषंगाने या दिवसाला अत्यंत महत्व आहे.गेल्या २० वर्षात युद्धजन्य परिस्थिती, वाढते औद्योगिकीकरण, परमाणु परिक्षण, मोठ्या प्रमाणात जंगलतोड इत्यादी अनेक कारणांमुळे हवामानातील बदलाने जगातील पर्यावरणाची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.कारण आज जगातील पर्यावरण अत्यंत धोकादायक व भयावह स्थितीत येवून ठेपले आहे.यामुळे मानव,पशु-पक्षी व संपूर्ण जीवसृष्टीला मोठा धोका निर्माण झाला आहे.आज जगामध्ये वाढते औद्योगिकीकरण, वायुप्रदूषण, जंगलतोड, युद्धजन्य परिस्थिती,वाढती उष्णता, वाढती लोकसंख्या यामुळे हवामानात रोज वेगवेगळे आमुलाग्र बदल होतांना आपण पहातो.जगात महाप्रलय, सुनामी,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,अती पाऊस,अती थंडी,अती उष्णता, वणवे लागणे, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक घटना जगात मानवाच्या अतिरेकामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.या येणाऱ्या आपदांची सटीक माहिती हवामान विभाग जगभर देत असते.यामुळे जगातील देश सतर्कता बाळगुन सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलतात. त्यामुळे आपण समजू शकतो की हवामान खात्याची भुमिका जगासाठी अत्यंत मोलाची आणि महत्त्वाची आहे.आज अत्याधुनिक युगात उपग्रहांच्या (सेटेलाईटच्या) माध्यमातून हवामानातील बदलांचे संकेत हवामान संस्था जगभरातील संपूर्ण देशांना वेळोवेळी देत असते. हवामानातील बदलांचे संकेत लोकांमध्ये जागृता निर्माण करण्याचे काम करीत असते.हवामान दिनाचे औचित्य साधून व हवामानातील वाढते बदल व धोका पहाता निसर्गाला संतुलित ठेवणे गरजेचे आहे. याकरीता जगातील संपूर्ण देशांनी हवामानातील मोठ्या प्रमाणात वाढते बदल पहाता आजच्या दिवसाला जास्तीत जास्त वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.यामुळे वाढत्या हवामानातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल. सोबत निसर्ग प्रफुल्लित राहुन संपूर्ण जंगलातील पशु-पक्ष्यांसाठी एक आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. कारण हवामानाचे संपूर्ण गणित निसर्गावरच अवलंबून आहे.त्यामुळे निसर्ग सुरक्षित रहाला तर हवामान सुध्दा सुरक्षित राहू शकते.याचा फायदा संपूर्ण जगाला व जीवसृष्टीला होईल.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार ) नागपूर**

# जागतिक क्षयरोग दिनाचे "२४ मार्च २०२५, क्षयरोगाविषयी जनजागरण

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर**
**रणजीत सिंह ठाकुर**

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमातर्गत 24 मार्च हा "जागतिक क्षयरोग दिन" म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी यांनी दिली आहे. जागतिक स्तरावर दरवर्षी 24 मार्च हा दिवस क्षयरोगविषयी जनजागृती करण्यासाठी "जागतिक क्षयरोग दिन" म्हणुन साजरा करण्यात येतो. राज्यात 100 दिवस मोहिमेच्या निमित्ताने विविध प्रभावी प्रचार व प्रचार माध्यमांच्या वापर करून क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यात आलेली आहे. जनजागृतीची व्याप्ती अधिक वाढविण्यासाठी ह्या दिवशी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले



आहे. जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक क्षयरोग दिनानिमित्त 24 मार्च 2025 साठी "Yes! We can End TB: Commit, Invest, Deliver" हे इंग्रजीतून तर "होय आपण क्षयरोग निश्चित संपवू शकतोः प्रतिज्ञा करा, तरतुद करा, सेवा द्या" हे मराठीतून घोषवाक्य तयार केलेले आहे. या घोषवाक्यानुसार क्षयरोग संपविण्यासाठी सर्वांनी 3 प्रकारची कार्यवाही करण्यावर विशेष भर देणे आवश्यक आहे.

१) प्रतिज्ञा करा सर्व भागीदारांनी क्षयरोग संपविण्यासाठी प्रतिज्ञा घेणे.

२) तरतुद करा नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे क्षयरोगविषयक सेवा सहज उपलब्ध करुन देण्यासाठी असलेल्या त्रुटी दुर करणे आणि प्रगतशील संशोधन करणे यासाठी निधीची तरतुद करणे.

३) सेवा द्या-क्षयरुग्णांच्या फायद्यासाठी प्रतिज्ञेनुसार व केलेल्या तरतूदीनुसार त्यांना दर्जेदार सेवा देणे.

या दिनानिमित्त क्षयरोगाविषयी समाजात जनजागृती करण्याकरीता विविध कार्यक्रम, बैठका, चर्चासत्रे, क्षयरोगाविषयक विविध प्रसिध्दी साहित्याचे प्रदर्शन, रॅली, चित्ररथ, रांगोळी स्पर्धा पथनाट्य, क्षयरोग मुक्त ग्राम पंचायत गौरव समारंभ इ. प्रकारे समाजातील सर्व स्तरावर विविध माध्यमाव्दारे कार्यक्रमाचे आयोजन करुन 24 मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणु साजरा करण्यात येणार आहे. टीबी मुक्त ग्रामपंचायत 2024 घोषित करण्याकरीता ग्रामपंचायत स्तरावरुन प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत. सन 2024 करीता 9 ग्रामपंचायतीची रौप्य पुरस्काराकरीता तसेच 180 ग्रामपंचायतींची कास्य पुरस्काराकरीता निवड करण्यात आलेली आहे.


**निक्षय मित्र ( क्षयरुग्ण दत्तक घेण्याकरिता )आवाहन**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमा अंतर्गत "प्रधानमंत्री टिबी मुक्त भारत अभियान" या धोरणानुसार क्षयरुग्णांना अभियानांतर्गत सामाजातील दानशुर व्यक्ती, संस्था, कंपनी, लोकप्रतिनिधी हे निक्षय मित्र बनून क्षयरुग्ण दत्तक घेवून त्यांना उपचार कालावधीपर्यंत प्रतिमहिना फुड बास्केट देण्यात यावी. आपल्या माध्यमाव्दारे समाजातील दानशुर, प्रतिष्ठित व्यक्तींना निक्षय मित्र होवून समाजातील गरजु व गरीब क्षयरुग्णांना पोषण आहार किट देवून शासनाच्या या उपक्रमास सहकार्य करावे. तसेच क्षयरोग मुक्तीसाठी सर्वाचा सहभाग महत्वाचा असून जनभागीदारी व्दारे ही मोहिम आपण यशस्वी करु शकतो तरी सर्वांनी या मोहिमेत सहभागी होवून ही मोहीम यशस्वी करुया असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रेश्मा पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश परभणकर यांनी केले आहे.

# 'पिलीव येथे 'श्री. संत एकनाथ षष्ठीचा"कार्यक्रम उत्साहात संपन्न".

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**

**( रघुनाथ देवकर):-** माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी सालाबाद प्रमाणे श्री विठ्ठल पांडुरंग मदने पाटील ( विठ्ठलवाडी) यांचे निवासस्थानी "श्री संत एकनाथ षष्ठीच्या"कार्यक्रमाचे आयोजन मध्ये पाटील परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. प्रथमता मदने पाटील परिवाराच्यावतीने श्री संत एकनाथ महाराजांच्या प्रतिमेचे




पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर झिंजेवस्ती ,पिलीव, कुसमोड, बचेरी, शिंगोर्णी, चांदापुरी, लक्ष्मीनगर ,सुळेवाडी येथील भजनी मंडळाचा सुस्त्राव्य भजनाचा कार्यक्रम टाळ मृदुंगाच्या गजरात व श्री विठ्ठल- रुक्मिणीच्या जयघोषामध्ये वातावरणात झाला. या भजनाच्या कार्यक्रमामुळे श्रोतेवर्ग मंत्रमुग्ध झाल्याचे समजते, भजनाच्या कार्यक्रमानंतर फुलांचा व आरतीचा कार्यक्रम होऊन सर्व उपस्थित त्यांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाला आसपासच्या खेड्यातील अनेक भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहिले होते शेवटी सर्व भजनी मंडळांचा सन्मान करण्यात आला.

# "झिंजेवस्ती (पिलीव) येथे "तुकारामबिज "साजरी"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**

**(रघुनाथ देवकर):-** माळशिरस तालुक्यातील निमगाव -पिलीव रोडवर श्री .लहू दादा पाटील यांचे वस्तीवर सालाबाद प्रमाणे तुकाराम बिजेचा कार्यक्रम आयोजित केला होता. सर्वप्रथम प्रथेप्रमाणे ज्येष्ठांच्या हस्ते श्री. संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या ठिकाणी श्री. विठ्ठल -रुक्मिणी भजनी मंडळ पिलीवचे सुनील सुतार ,मुकुंद सुरवसे, दिगंबर महामुनी ,बजरंग वाघमारे ,दत्तात्रय सुतार ,बाबुराव सुतार व त्यांचे सर्व सहकारी भजनी यांनी तबला ,पेटी ,टाळ, विणा यांच्या सहाय्याने अतिशय चांगल्या प्रकारचा भजनाचा कार्यक्रम सादर केला व असंख्य भाविक भक्तांच्या समवेत ज्ञानोबा तुकाराम व श्री. विठ्ठल रुक्मिणीच्या जयघोषामध्ये पुष्पवृष्टी करून श्री .व सौ .लहू दादा पाटील यांच्या हस्ते आरतीचा कार्यक्रम घेऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.



# तीव्र उन्हाळ्यापासून बचाव करण्यासाठी जाळीचे आच्छादन

### ठाणे महानगरपालिकेचा प्रायोगिक तत्त्वावर उपक्रम..

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव**

ठाणे (२२) :* सध्या तीव्र उन्हाळा सुरू असल्याने वाहन चालकांना सिग्नलच्या प्रतिक्षेत उभे असताना उन्हाचा त्रास जाणवू नये म्हणून ठाणे महानगरपालिकेतर्फे प्रायोगिक तत्वावर गोखले रोड वरून तीन हात नाक्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर जाळीचे आच्छादन टाकण्यात आले आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबविण्यात येत आहे. गोखले रोड वरील ही जाळी १०० फूट लांब, २५ फूट रुंद असून तिची उंची रस्त्यापासून २० फूट एवढी आहे. या जाळीमुळे वाहन चालकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल. आणखी काही ठिकाणी अशाप्रकारे जाळी उभारण्याचा ठाणे महानगरपालिकेचा मानस आहे



# प्रहार दिव्यांग क्रांती यांच्या दिव्यांगांच्या आंदोलनाला मधु ताराचा जाहीर पाठिंबा.

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



दिनांक 22 मार्च 2025 रोजी किल्ले रायगड पायथ्याशी पाचाड तालुका महाड जिल्हा रायगड येथे दिव्यांग आणि शेतकरी यांच्या हक्कासाठी स्वावलंबनासाठी न्यायासाठी दिव्यांगांचे दैवत आदरणीय बच्चूभाऊ कडू यांच्या तीन दिवसीय अन्नत्याग आंदोलनाला मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य* *संस्थापक अध्यक्ष श्री नितीनजी शिंदे यांनी जाहीर पाठिंबा दिला. तसे पत्र ही आदरणीय बच्चूभाऊ यांना देण्यात आले. यावेळी मधु तारा प्रमुख यांची भाऊंसोबत चर्चाही झाली. या वेळी खानदेश.विदर्भ येथील असंख्य दिव्यांग बंधू भगिनी आंदोलनात सहभागी होण्यासाठी मधु तारा सोबत उपस्थित होत्या. 21,22,23 तीन दिवसीय आंदोलनाला राज्यभरातून लाखो दिव्यांगांची या वेळी उपस्थिती होती.

# ठाणे येथे जिल्हास्तरीय निपुण भारत अभियानांतर्गत मातापालक सन्मान सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**रणिता ठाकूर रायगड**

दिनांक २० मार्च २०२५ स्थळः बी. जे हायस्कुल, ठाणे.

निपुण भारत अभियानांतर्गत समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने २० मार्च २०२५ रोजी बी. जे हायस्कुल, ठाणे येथे मातापालक सन्मान सोहळा व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या

कार्यक्रमाचा मुख्य उद्दीष्ट विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात मातापालकांची भूमिका अधिक सशक्त करणे हे होते.कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय रोहन घुगे(भा.प्र.से), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी, प्राथमिक जिल्हा परिषद ठाणे यांनी निपुण भारत अभियानाचे प्रास्ताविक केले. त्यांनी कार्यक्रमाच्या उद्दीष्टांचा उल्लेख करत, शाळेतील शिक्षणाच्या गुणवत्तेची दृष्टी आणि शाळेच्या कामकाजात मातापालकांच्या सक्रिय सहभाग महत्त्वाचा ठरतो, असे सांगितले.रोहन घुगे (भा.प्र.से) यांनी मातापालकांना संबोधित करताना, शालेय शिक्षण सुधारण्यासाठी मातापालकांचा सक्रिय सहभाग महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट केले. "निपुण भारत अभियान"चे उद्दीष्ट देशभरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे असून, त्यासाठी मातापालकांचे मार्गदर्शन आवश्यक आहे व शिक्षणाचे ५ आयाम आहेत व ते समजून प्रत्येक मातेने आपल्या पाल्याला मार्गदर्शन करावे असे ते म्हणाले. ठाणे जिल्हास्तरीय निपुण भारत अभियान कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मातापालकांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या सन्मानामुळे मातापालकांना अधिक प्रोत्साहन मिळालं. त्याचप्रमाणेउत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख आणि नोडल अधिकारी यांचा देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

ठाणे जिल्हास्तरीय निपुण भारत अभियान कार्यशाळेत स्मितीन ब्रिद (बाल शिक्षण कार्यक्रम प्रमुख, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन) आणि ऋतुजा पाटील (मुंबई विभाग समन्वयक, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन) यांनी निपुण भारत अभियान उपक्रमावर मार्गदर्शन केले. यावेळी, मातापालक भेटी दरम्यातील अनुभव मांडले व मातांना मुलांच्या शिक्षणात अधिक सक्रिय होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. ठाणे जिल्हास्तरीय निपुण भारत अभियान कार्यशाळेत मातापालकांनी निपुण भारत स्टॉल लावले होते, ज्यामध्ये त्यांनी मुलांसोबत बनवलेले शैक्षणिक साहित्य, पौष्टिक पदार्थ आणि विविध कल्पकतेचे मांडणी आयडिया व्हिडीओनुसार साहित्याची मांडणी पाहायला मिळाली. कार्यशाळेची सुरूवात भरत वेखंडे सर यांनी केली, ज्यात "निपुण भारत अभियान म्हणजे काय?" याबद्दल, त्याची उद्दीष्टे, शालेय शिक्षण सुधारणा, विद्यार्थ्यांशी संवाद वाढवण्याच्या पद्धती आणि घरामध्ये योग्य शिक्षण वातावरण तयार करण्याविषयी चर्चा करण्यात आली. कार्यशाळेत सहभागी झालेल्या मातापालकांनी त्यांच्या विचारांची मांडणी केली आणि शंकांचे निरसन केले.




ठाणे जिल्हास्तरीय निपुण भारत अभियान कार्यशाळेत शालेय शिक्षण व्यवस्थेत मातापालकांचा सक्रिय सहभाग आणि एकजुटीचे महत्त्व स्पष्टपणे दिसून आले. निपुण भारत अभियानाच्या माध्यमातून शिक्षक, विद्यार्थी आणि मातापालकांचे योगदान शिक्षणाच्या गुणवत्तेत मोठा बदल घडवू शकते, असा विश्वास व्यक्त केला गेला. सदर कार्यक्रमात मुरबाड, शहापूर,कल्याण, अंबरनाथ,भिवंडी, ठाणे महानगर पालिका, नवीमुंबई महानगर पालिका, कल्याण डोंबिवली महानगर पालिका, उल्हास नगर मनपा,मीरा भाईंदर मनपा, भिवंडी मनपा. या सर्व शिक्षण विभागमधील अधिकारी,शिक्षक आणि निपुण लीडर माता पालक उपस्थितीत राहून कार्यक्रमात उत्कृष्ट सहभाग दर्शवून कार्यशाळेची शोभा वाढवली. एकंदरीत सदर माता पालक सन्मान कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला.

# मिआने मुंबईत सुरु केले फ्लॅगशिप स्टोर

## ओबेरॉय मॉलमध्ये शानदार फ्लॅगशिप स्टोरचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी**




२२ मार्च २०२५ :भारतातील सर्वात मोठ्या फाईन ज्वेलरी ब्रँड्सपैकी एक, तनिष्क परिवारातील एक ब्रँड, मिआने गोरेगावच्या ओबेरॉय मॉलमध्य आपले नवीन फ्लॅगशिप स्टोर सुरु करून मुंबईमध्ये आपले स्थान मजबूत केले आहे. मिआ बाए तनिष्कचे रिटेल हेड श्री संजय भट्टाचारजी यांनी नवीन स्टोरचे उदघाटन केले. गुढीपाडव्याचा मोठा सण जवळ येत आहे, त्यानिमित्ताने मिआने 'रनवे स्टार इव्हेन्ट' चे आयोजन करून ग्राहकांसोबतचे आपले नाते अजून दृढ केले. गोरेगावच्या ओबेरॉय मॉलमध्ये पहिल्या मजल्यावर ८०० चौरस फुटांच्या या स्टोरमध्ये मिआच्या सिग्नेचर ज्वेलरीचे विशाल कलेक्शन प्रस्तुत करण्यात आले आहे. १४ आणि १८ कॅरेट सोने, हिरे आणि चांदीचे, ट्रेंडी, वजनाला हलके डिझाईन इथे मिळतात. मुंबईमध्ये नवीन स्टोर सुरु होत असल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ ब्रँडने २०% पर्यंतची सूट देऊ केली आहे. २१ ते २३ मार्च २०२५ पर्यंत या आकर्षक ऑफरचा लाभ घेता येईल. (अटी लागू आहेत) आमच्या गोल्डन हार्वेस्ट स्कीममध्ये भाग घेऊन ग्राहक आपली चमक वाढवण्यासाठी गुंतवणूक करू शकतील, याचे हफ्ते फक्त २००० रुपयांपासून सुरु होतात, देशभरात कोणत्याही मिआ स्टोरमध्ये दागिने खरेदीवर तुमच्या मासिक गुंतवणुकीच्या ७५% पर्यंतची खास सूट मिळवण्याची ही सुवर्णसंधी आहे. श्री संजय भट्टाचारजी, रिटेल हेड, तनिष्क म्हणाले,"मुंबई आमच्यासाठी नेहमीच एक महत्त्वाचे मार्केट आहे. आज ओबेरॉय मॉलमध्ये आमचे नवे फ्लॅगशिप स्टोर सुरु होत असल्याची घोषणा करताना मला खूप आनंद होत आहे. आमच्या ग्राहकांना बहुउपयोगी, शानदार आणि कोणत्याही प्रसंगी सहज परिधान करता येतील असे दागिने आवडतात. नवीन त्यांना आमच्या अजून जवळ घेऊन येईल. रनवे स्टार इव्हेन्टमध्ये आम्ही आमच्या ग्राहकांना सन्मानित केले, स्वतःची अनोखी शैली आत्मविश्वासाने स्वीकारण्यासाठी त्यांना सक्षम बनवले. महाराष्ट्रात आमची ३० स्टोर्स आहेत त्यापैकी १९ मुंबईमध्ये आहेत, मिआ ब्रँड आपले स्थान उत्तरोत्तर मजबूत करत राहील, शहरातील फॅशन-फॉरवर्ड ग्राहकांची आवडनिवड, गरजा, मागण्या पूर्ण करत राहील. हे नवे स्टोर महाराष्ट्रातील आमचे ३१वे स्टोर आहे, आधुनिक फाईन ज्वेलरी जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची आमची वचनबद्धता यामधून दिसून येते. श्री समीप पाठक, सीईओ - मॉल्स, ओबेरॉय रिअल्टी यांनी सांगितले,"गोरेगावच्या ओबेरॉय मॉलमध्ये मिआ बाए तनिष्कचे स्वागत करताना आणि टायटनसोबत आमची भागीदारी दृढ करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. आघाडीच्या लक्झरी आणि लाइफस्टाइल ब्रँड्ससाठी हमखास ठिकाण ही आमची ओळख त्यामुळे अधिक मजबूत झाली आहे. आमच्या खास निवडून तयार करण्यात आलेल्या रिटेल पोर्टफोलिओमध्ये तनिष्क आणि अर्थ आधीपासूनच आहेत, आमच्याकडे येणाऱ्या ग्राहकांना प्रीमियम खरेदीचा अनुभव मिळवून देण्यासाठीची आमची बांधिलकी यामधून दिसून येते. ओबेरॉय रिअल्टीमध्ये आम्ही आमच्या ब्रँड पार्टनर्ससोबत सातत्याने समन्वय साधत असतो, वेगळ्या जगात घेऊन जाणारे रिटेल अनुभव प्रदान करून खरेदीदारांसोबतचे नाते अधिकाधिक घनिष्ठ होत राहावे, हा आमचा प्रयत्न असतो." मुंबईमध्ये सुरु करण्यात आलेल्या मिआच्या सर्वात नवीन कलेक्शनमध्ये ब्रँडचे सर्वात नवीन फेस्टिव्ह कलेक्शन, नुकतेच लॉन्च करण्यात आलेले 'क्युपिड एडिट ३.०' आणि 'मिआ डिस्को' कलेक्शन आहेत. १४ आणि १८ कॅरेट सोन्यापासून बनवण्यात आलेल्या, वजनाला हलक्या, आधुनिक डिझाइन्सची विशाल रेन्ज इथे आहे, मिआचे ब्रँड सिद्धांत आणि स्टाईल यांना एकत्र आणून हे दागिने सहज परिधान करण्याजोगे बनवण्यात आले आहेत.

# रिसोड येथे जागतिक जल दिन कार्यक्रमाचे आयोजन.

**रिसोड वार्ताहर**
**रणजीत सिंह ठाकुर**

'जल है तो कल है' हिंदिमधील ह्या लोक्तोतीला हलक्यात न घेता ह्यामध्ये दडलेला सारगर्भित अर्थ समजून घेणे काळाची गरज आहे.पृथ्वीवरील विद्यमान भौतिक वस्तू शिवाय मनुष्य अनेक दिवस जगु शकतो पण पाण्याशिवाय जगणे अशक्य आहे. पाण्याची योग्य निगा राखत दैनंदिन जीवनामध्ये जर योग्य त्यावेळी पाण्याचे सेवन केले तर अनेक आजारापासून मानवाची मुक्तता होते याऊलट अशुध्द पाणी अनेक दुर्धर आजारांना आमंत्रित करते,हे तेवढेच खरे !असे मत महात्मा फुले विद्यालय रिसोड येथे गजानन महादेव आप्पा मुलंगे ह्यांनी आयोजित केलेल्या 'जागतिक जल दिन' कार्यक्रमानिमित्त व्यक्त केले.कार्यक्रमाकरिता नंदकिशोर डाखोरे पाणी पुरवठा अभियंता,विनोद बांगर वॉलमॅन नगर परिषद रिसोड,विष्णु जटाळे वनपाल सामाजिक वनिकरण परिक्षेत्र रिसोड,गजानन कोरडे पोलीस पाटील रिसोड,विठ्ठल सारोळकर मुख्याध्यापक,विठ्ठल राठोड क्रिडा शिक्षक महात्मा फुले विद्यालय रिसोड प्रामुख्याने उपस्थित होते.अमृत रुपी पाण्याचे महत्व विशद करतांना मुलंगे म्हणाले कि,पावसाच्या रुपाने पडणार्या पाण्यापैकी फक्त 2 टक्के पाणि पिण्यायोग्य असते.त्यामुळे शक्यतोवर पाण्याचा वापर काटकसरीने करावा.आजपासुन साधारणतः60 वर्षापुर्वी प्रत्येक कामाकरिता विहिरी मधुन पाणी शेंदावं लागत असे.अर्थात जमीनीतील पाण्याचा उपसा फारच कमी होत असल्यामुळे जमिनीतील जलस्तर कायम राहुन कोरडवाहु शेतामध्ये सुध्दा कसदार पिकं बहरत असे.तसेच एप्रिल महिन्यापर्यंत अनेक नद्यांचं निर्मळ पाणी वाहतांना दिसत असे.ह्या सत्य घटना



आज रोजी इतिहास जमा होत आहेत.अनेक ठिकाणी चार चाकी गाड्या धुणे,शौचालयामध्ये भरमसाठ पाणी सोडणे,कॉंक्रिटयुक्त रस्ते पाण्याने धुणे अश्या निरर्थक कामामुळे जमीनीतील पाण्याचा भरमसाठ उपसा होत आहे तर दुसरीकडे ग्रामीण भागात एक घागर पाण्या करीता कोसोदुर भटकंती करावी लागत आहे हि चिंतनीय बाब आहे.सद्धस्थितीत प्रत्येक राज्यशासन जलस्तर वाढविण्याच्या अनुषंगाने जल-पुनर्भरण योजनेची अंमलबजावणी करत आहे,हि अभिमानास्पद बाब आहे.पण नैसर्गिक पध्दतीने अर्थात झाडांच्या मुळाद्वारे जो जलस्तर वाढतो त्याची बरोबरी इतर कृत्रिम पध्दतीने होत नाही हे हि तेवढेच खरे.झाडांची मुळे जमिनीमध्ये खोलवर आणि दूरपर्यंत रुजलेली असतात.पावसाळ्या मध्ये सदर्हु मुळे पाईप लाईन चे काम करत खोल आणि दूरपर्यंत पाणी मुरवतात त्यामुळे जलस्तर वाढविण्याच्या दृष्टिकोनातून उपस्थितांना येत्या पावसाळ्यात एक झाडं लावण्याचा सल्ला देण्यात आला.कार्यक्रमाच्या सरती शेवटी "काय उपयोग तुमच्या पैशाचा आणि सोन्याच्या नाण्यांचा, जेव्हा नसेल तुमच्याकडे,एकही थेंब पाण्याचा" ची घोषणा देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द • ख • ल

## स्व. दत्तराज म्हात्रे यांच्या निधनाने कोप्रोली गावावर शोककळा

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी/हेमाली पाटील**




' मृत्यू सत्य आहे आणि शरीर नश्वर आहे', हे माहित असूनही आपली जवळची व्यक्ती गेल्याने अतिशय दुःख होते. अशीच हृदयद्रावक घटना सोमवार दिनांक 17 मार्च 2025 रोजी कोप्रोली गावात घडली. सुहास मित्र मंडळाचे माजी अध्यक्ष,कोप्रोली पाणी कमीटीचे सभापती, सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय दत्तराज हिरामण म्हात्रे( वय 51 वर्षे) यांचे आकस्मित निधन झाले. या आश्चर्य चकित बातमीने संपूर्ण गाव दुःखाने हळहळले. मैत्रीचे नाते जपणारे, लहानथोरांशी आदराने वागणारे, सतत हसतमुख असणारे, गावच्या विकासासाठी झटणारे, शिक्षणाचे महत्त्व जाणणारे, सुशिक्षित उमदा व्यक्ती कोप्रोलीतून हरवला. त्यांच्या पश्चात त्यांची आई,पत्नी, मुलगी,आणि मुलगा असा छोटा परिवार आहे..त्यांच्या अशा अचानक जाण्याने म्हात्रे परिवाराच्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली. ती भरून काढणे अशक्य आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार दिनांक 26/03/2025 रोजी चिरनेर –भोम खाडी येथे करण्यात येणार आहे, तर उत्तरकार्य विधी शुक्रवार दिनांक 28/03/2025 रोजी कोप्रोली येथील राहत्या घरी करण्यात येणार आहे.म्हात्रे कुटुंबाला या दुःखातून सावरण्यास शक्ती मिळो आणि त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरंतन शांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना. जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली.

## राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या लातूर जिल्हा उपाध्यक्ष पदी श्री. अमोल सुभाष गोरे यांची नियुक्ती .

**अहमदपूर**
**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**



दि.20मार्च 2025 रोजी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.गणेश कचकलवार यांच्या आदेशाने व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष श्री.गणेश महाडिक यांच्या हस्ते तसेच पश्चिम महाराष्ट्र उपविभाग प्रमुख श्री.कांताभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली .श्री. संतोष लांडे विभागीय सचिव पश्चिम महाराष्ट्र. मावळ तालुका अध्यक्ष श्री गोपाळ भालेराव यांच्या शिफारसीने श्री. अमोल सुभाष गोरे . यांची राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या लातूर जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. असून श्री अमोल सुभाष गोरे यांनी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे आभार मानले व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पुढील कार्यकारिणीस पुढील कामास तत्पर हजर राहून कार्य जोमाने करण्याचे आश्वासन दिले. युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या लातूर जिल्हा उपाध्यक्ष पदी श्री. अमोल सुभाष गोरे यांची नियुक्ती झाल्या बद्दल. सामाजिक. राजकीय. शैक्षणिक. पत्रकारिता क्षेत्रातून शुभेच्छाचा वर्षाव होत. आहे

## विद्यार्थ्यांनी घेतली पाणी बचतीची शपथ विवेकानंद विद्यालयात जलदिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी :- महेश राऊत**

शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद विद्यालयात जागतिक जलदिन २२मार्च रोजी साजरा करण्यात आला.पाण्याचा अयोग्य ,अविचारी व अतिवापर होत असल्याने पाण्याची समस्या जगाला भेडसावत आहे.पाणी हे जीवन आहे असे असले तरी पाण्याचे संकट जाणवत आहे .भविष्यात पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता आहेअशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी ,पाणी बचतीचा संदेश देण्यासाठी विवेकानंद विद्यालयात जलदिन साजरा करण्यात आला. सहशिक्षक विजय चौधरी यांनी विद्यार्थ्यांना जलप्रतिज्ञेद्वारे पाण्याचे महत्व समजावून सांगितले.
विद्यार्थ्यांनी पाणी बचतीचे संदेश फलक तयार केले.जल है तो कल है अश्या घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या.

## अफ्फान बागवान या चिमुकल्याचा रोज

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर**
**शिरुर अनंतपाळ लातूर**



: तालुक्यातील सकोळ येथील अफ्फान इरफान बागवान या अवघ्या सहा वर्षाच्या चिमुकल्याने कड़क ऊन्हाळ्यात अपला रोजा पूर्ण करून अल्लाह प्रति आपली भक्ति व्यक्त केली आहे
मानवतेचा संदेश देणाय्रा व मुस्लिम बांधवांच्या प्रवित्र रमजान रोजा सुरु असुन आवालवृध्द दिवसभर अन्न व पाण्याविना रोजा राहुन अल्लाह ची इबादत करतात यात लहान मुले ही मागे नसुन साकोळ येथील फक्त सहा वर्षाच्या अफ्फान या मुलाने रोजा पूर्ण करुन इफ्तार च्या वेळी समस्त मानव जातिच्या कल्याणासाठी अल्लाह कडे दुआ केली अफ्फान ने लहान वयात रोजा पूर्ण केल्याबदल माजी कृषी सभापती गोविंदराव चिलकुरे, जेष्ट पत्रकार ओमप्रकाश तांबोळकर साकोळ ग्रा.प.चे माजी सरपंच अब्दुल अजीज मुल्ला व साकोळ येथील ग्रामस्थातुन अफ्फान याचे बद्दल याचे कौतुक केले जात आहे.

# विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना मिळाली भरारी : घाटंजीतील गिलाणी महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

घाटंजी : पदवी वितरण समारंभ हा विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या नंतर घेतल्या जातो व विद्यापीठाने दिलेली पदवी ही महाविद्यालयीन स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना मिळावी यासाठी याचे आयोजन केल्या जाते. उन्हाळी 2024 परीक्षेमधून जे विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान स्नातक व स्नातकोत्तर (मराठी व इतिहास) पदवी प्राप्त करून उत्तीर्ण झालेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना याप्रसंगी पदवी वितरित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.




एम. ए. शहजाद, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आर.बी. भांडवलकर , प्राचार्य, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ तसेच गिलानी महाविद्यालयाचे आय. क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. वाय. एस. माहुरे,फॅकल्टी व बी. ओ. एस. सदस्य डॉ. टी. एम. कोटक, एन.एस.एस. विभाग प्रमुख डॉ. सी. आर. कासार, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. एन.एस. धारकर आणि विद्यार्थी विकास विभागाचे डॉ.आर.बी. टेंभुर्णे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने व राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. एस.एन.मोरे यांनी तर प्रास्ताविक डॉ. एन.एस.धारकर यांनी केले, डॉ. वाय. एस. माहुरे यांनी विद्यार्थ्यांना यश मिळवून महाविद्यालयाचे नाव मोठे करण्यासाठी शुभेच्छा दिल्या तर डॉ. आर. बी. भांडवलकर यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना समाजाचे ऋण फेडण्यासाठी गाडगेबाबांच्या दशसूत्री ला अवलंबण्याची सूचना केली. डॉ. एम.ए. शहेजाद यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना आई वडिलांचे नाव मोठे करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता डॉ. पी.आर. राऊत, डॉ. जी.सी.भगत, डॉ.व्हीं.एस. जगताप, श्री. ए.पी.भगत, कु.जे.पी.मोरे, डॉ.कविता किर्दक, डॉ.एन.एन. तिरमणवार, डॉ. व्हि. के.जगताप, डॉ.एम.एच ढाले, श्री.चेतन शहाकर, श्री. राजेंद्र घोडीले, डॉ.सलीम शेख, श्री. प्रणित ठाकरे, श्री. प्रदीप राठोड, श्री. सौरभ माकडे, श्री.अमित ओळंबे, श्री. करण किनाके, श्री.अनिल कापसे, श्री. अंकुश मडावी व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावर 'शास्त्रार्थ' मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालय नवीन पनवेल द्वारे शास्त्रार्थ– राष्ट्रीय स्तराचे मूट कोर्ट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यामध्ये गोवा, बंगलोर, चेन्नई आणि नागपूर सारख्या देशभरातील विविध विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्या अनुषंगाने या स्पर्धेने वकीलांना त्यांची कौशल्ये सादर करण्यासाठी आणि कायदा क्षेत्रातील अमूल्य अनुभव मिळवण्यासाठी एक अनोखा मंच प्रदान केला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक अपराजिता गुप्ता यांनी केले. या कार्यक्रमाच्या उदघाटन सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश विजय अचलिया, संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव एस. टी. गडदे, संचालक अर्चना ठाकूर, ऍड. विनायक कोळी, भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या सानवी देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या आणि अशा स्पर्धांचा कायदेशीर ज्ञान वृद्धीकरणात व भविष्यकाळातील कायदेशीर व्यावसायिकांच्या घडवण्यात असलेला महत्त्वावर भर दिला. त्यांच्या समर्थनामुळे आणि मार्गदर्शनामुळे या कार्यक्रमाची यशस्विता निश्चित झाली आणि स्पर्धकांना त्यांच्या कायदेशीर प्रवासात पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली. " शास्त्रार्थ " – राष्ट्रीय स्तराचे मूट कोर्ट स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा भाग असून त्याची सुरुवात आजपासून झाली. त्यात एक प्रतिष्ठित कायदेशीर तज्ञांचा पॅनेल नियुक्त करण्यात आला. सकाळच्या शिफ्टमध्ये न्यायाधीश म्हणून एड्वोकेट स्वप्निल पाटील, एड्वोकेट अश्विन सिंग, एड्वोकेट अश्विन आडवानी, एड्वोकेट वैभव घाटके, एड्वोकेट निलेश बागडे, एड्वोकेट सोनिया पवार, एड्वोकेट इंद्रजीत भोसले, आणि एड्वोकेट भक्ती दळवी यांचा समावेश होता. दुपारच्या शिफ्टमध्ये न्यायाधीश म्हणून एड्वोकेट सुजय, एड्वोकेट लक्षणा पाटील, एड्वोकेट पूजा भोसले, एड्वोकेट सागर पसपोहे, एड्वोकेट शुभांगी झीटे, एड्वोकेट धनिष्ठा कावले, एड्वोकेट मोहनसिंग राजपूत, आणि एड्वोकेट हृषिकेश वाणी यांचा समावेश होता. यावेळी एक "रिसर्चर टेस्ट" देखील घेतली गेली, ज्यामुळे सहभागींना एक शैक्षणिक आव्हान दिले गेले आणि त्यांना आगामी कडक फेऱ्यांसाठी योग्यरीत्या तयार करण्यात आले. ही स्पर्धा कायदेशीर मानांना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. देशभरातील सहभागी आपल्या वकिली कौशल्यांचे प्रदर्शन करत असून, "शास्त्रार्थ " युवा वकिलांना अमूल्य न्यायालयीन अनुभव मिळवण्याचा, कायदेशीर व्यावसायिकांशी नेटवर्किंग करण्याची आणि राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा दाखवण्याची एक उत्तम संधी ठरली आहे. या स्पर्धेने कायद्याच्या क्षेत्रात शिकण्याची, संवाद साधण्याची आणि व्यावसायिक विकासाची भरपूर संधी दिली आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना सर्वेक्षण प्रशिक्षण संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाने मोठ्या प्रमाणावर घरकुल मंजूर केली होती. २०१८ मध्ये 'आवास प्लस' ऑनलाइन सर्वेक्षणाद्वारे तयार केलेल्या प्रतीक्षा यादीत काही पात्र कुटुंबांचा समावेश नसल्याची बाब निदर्शनास आली होती. त्यामुळे या कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळू शकला नाही. ही अडचण लक्षात घेऊन सरकारने प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत सुधारित सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार गट विकास अधिकारी व डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे प्रशिक्षण रायगड जिल्हा परिषदेत शुक्रवारी (दि.२१) मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत पार पडले.प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेसाठी शासनाने २०१२ मध्ये गावनिहाय 'आवास प्लस' हे ऑनलाइन सर्वेक्षण केले होते. त्यानंतर २०१८ मध्ये या सर्वेक्षणाच्या आधारे गावनिहाय लाभार्थ्यांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात आली. या प्रतीक्षा यादीतील लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने घरकुलाचा लाभ दिला जात आहे, पुढील काही दिवसात पहिला टप्पा पूर्ण होण्याची शक्यता असून, सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ हाती घेण्यात आला आहे.२०२८–२९ पर्यंत प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन राबवली जाणार असून, त्यासाठी पात्र कुटुंबांची निवड करण्यासाठी नव्याने सुधारित सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादीत नसलेल्या आणि शासनाच्या निकषांनुसार पात्र असलेल्या कुटुंबांना आता घरकुलाचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या अनुषंगाने गट



विकास अधिकारी व डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे प्रशिक्षण रायगड जिल्हा परिषदेत शुक्रवारी पार पडले. जिल्हा पोग्रामार जागृती पोवळे यांनी उपस्थितांना सुधारित सर्वेक्षण बाबत माहिती दिली.यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे उपस्थित होते.

## नांदेडच्या नरसी नायगाव मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश सोहळा मा.खा. भास्करराव पाटील खतगावकर यांनी घड्याळ चिन्ह हाती घेणार

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** - येत्या 23 तारखेला राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत राज्याचे माजी मंत्री तथा मा.खासदार भास्करराव पाटील खतगावकर साहेब,माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा आणि युवा नेत्या डॉ.मीनलताई पाटील खतगावकर राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत सदरील प्रवेश सोहळ्याच्या कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.यासंदर्भात मिलेनियम स्कूल नायगाव येथे कार्यकर्त्यांशी आदरणीय खतगावकर साहेब आणि लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांनी संवाद साधला. याप्रसंगी माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा,राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी,बैठकीचे आयोजक तथा माजी सभापती शिवराज पाटील होटाळकर,विनायकराव पाटील शिंदे,बालाजीराव शिंदे,माधव पावडे,दिपक पावडे,राजू गंदीगुडे,राजेश भिलवंडे,प्रा.जीवन चव्हाण,आनंदराव जामगावकर,बापूराव पाटील कार्लेकर,गंगाजी



पाटील मुगावकर,रमेश शेटकर,श्याम चोंडे,श्रीपत पाटील शिंदे,गुलाबराव पाटील सोमठाणकर,आनंद पाटील शिंदे,श्रीहरी पाटील शिंदे,यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते आणि पत्रकार बांधव उपस्थित होते.

# नात्यांमध्ये दुरावत चाललेला ओलावा संवाद संपला, नात्यातील ओलावाही हरवला!

**– आसाराम विरकर, उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

कधी काळी ज्या नात्यांमध्ये प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा होता, त्या नात्यांमध्ये आज अंतर वाढत आहे. संवाद असला तरी तो फक्त वरवरचा उरला आहे. मनातील भावना कुणी समजून घेत नाही, त्यामुळे नात्यांमधील ओलावा संपत चालला आहे. जे नाते कधी काळी आत्मीयतेने फुलले होते, ते आज फक्त औपचारिक भेटीगाठींपर्यंत सीमित राहिले आहेत.

**संवाद हरवला, नात्यांचा ओलावाही हरवला**

पूर्वी घरातील प्रत्येक सदस्य एकमेकांच्या सुख–दुःखात सहभागी व्हायचा. आजही सगळे एकत्र राहतात, पण मनाने मात्र दूर झालेले असतात. कधीकाळी आपले अश्रू समजून घेणारे आपलेच लोक आज त्याच अश्रूंना दुर्लक्ष करून पुढे जातात.

मनाने हळवे असणारे लोक जास्त दुखावले जातात. जेव्हा आपण एखाद्या नात्यावर पूर्ण विश्वास ठेवतो आणि नंतरच त्याच लोकांकडून आपल्या पाठीमागे कुजबुज होते, तेव्हा मन पूर्णपणे कोलमडून जाते. ही जखम इतकी खोल असते की, कितीही प्रयत्न केले तरी नातं पुन्हा पूर्वीसारखं जुळत नाही.

**का दुरावत आहेत नाती?**

**१. संवादाची उणीव**

पूर्वी मोकळेपणाने बोलण्याची, मन मोकळं करण्याची सवय होती. आज प्रत्येक जण सोशल मीडियावर तासंतास अडकलेला असतो, पण नात्यांमध्ये संवाद हरवत चालला आहे. लोक



बोलतात, पण ऐकण्यासाठी कुणाकडे वेळ नाही.

**२. अहंकार आणि स्वार्थ**

नात्यांमध्ये प्रेम राहो न राहो, अहंकार मात्र हक्काने घर करतो. "मी का बोलू?", "तोच का नाही बोलत?" असे विचार नात्यांना अधिक दुरावत नेतात. प्रत्येकाला फक्त स्वतःचा फायदा आणि स्वार्थ महत्त्वाचा वाटतो, त्यामुळे नात्यांमधील गोडवा नष्ट होतो.

**३. कुजबुज आणि अविश्वास**

समोर गोड बोलणं आणि पाठीमागे कुजबुज करणं यामुळे विश्वास उध्वस्त होतो. विश्वास गमावलेली नाती टिकत नाहीत. दुसऱ्याबद्दल काही बोलायचं असेल, तर समोर स्पष्ट बोलावं, पण पाठीमागे बोलून नाती नष्ट करू नयेत.

**४. माणसापेक्षा पैशाला आणि अहंकाराला दिलेली प्राधान्यता**

नात्यांमध्ये पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची झाली आहे. माणसाच्या भावनांपेक्षा संपत्ती आणि सामाजिक दर्जा मोठा मानला जातो. त्यामुळे आत्मियतेच्या जागी स्वार्थाने घर केलं आहे.

**हरवलेली नाती पुन्हा जोडायची असतील तर**

**१. स्पष्ट बोला, पण प्रामाणिकपणे**

कुणाविषयी काही मनात असेल, तर समोरच बोला. पाठीमागे कुजबुज केल्याने नात्यांची दुरावस्था होते. स्पष्टपणे बोलल्याने गैरसमज दूर होतात आणि नात्यांमध्ये पारदर्शकता राहते.

**2. विश्वास टिकवा**

एकदा विश्वास तुटला की, तो पुन्हा जोडणं कठीण असतं. म्हणूनच, तात्पुरत्या फायद्यासाठी कुणाच्या विश्वासाशी खेळू नका. विश्वास गमावल्यावर नातं फक्त नावापुरतंच उरतं.

**3. अहंकार बाजूला ठेवा**

अहंकार टिकवण्यासाठी नाती तोडणारे अनेक असतात, पण नाती टिकवण्यासाठी अहंकार बाजूला ठेवणारे कमी असतात. प्रेम आणि जपणूक याशिवाय कोणतंच नातं दीर्घकाळ टिकू शकत नाही.

**4. माफ करायला शिका**

प्रत्येक नात्यात चुकाही होतात, पण त्या चुकांवर राग धरून नातं तोडण्यापेक्षा, माफ करण्याची आणि समजून घेण्याची ताकद ठेवल्यास नातं वाचवता येईल.

**समाप्ती: नाती टिकवा, ओलावा जपूया!**

नाती तोडली जातात, तेव्हा आवाज होत नाही, पण वेदना खोलवर रुततात. म्हणूनच, संवाद ठेवा, स्पष्ट बोला, विश्वासाला तडा जाऊ देऊ नका, आणि प्रेम व्यक्त करा.

शेवटी, पैसा, प्रसिद्धी, आणि यश मिळवण्यासाठी धावता धावता आपण ज्या माणसांना गमावतो, तेच आपल्या आयुष्याची खरी संपत्ती असतात. म्हणूनच संवाद जपूया, नात्यांचा ओलावा टिकवूया!

# भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावर 'शास्त्रार्थ' मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालय नवीन पनवेल द्वारे शास्त्रार्थ– राष्ट्रीय स्तराचे मूट कोर्ट स्पर्धा २१ ते २३ मार्च पर्यंत आयोजित करण्यात आली आहे. त्यामध्ये गोवा, बंगलोर, चेन्नई आणि नागपूर सारख्या देशभरातील विविध विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्या अनुषंगाने या स्पर्धेने वकीलांना त्यांची कौशल्ये सादर करण्यासाठी आणि कायदा क्षेत्रातील अमूल्य अनुभव मिळवण्यासाठी एक अनोखा मंच प्रदान केला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक अपराजिता गुप्ता यांनी केले.




या कार्यक्रमाच्या उदघाटन सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश विजय अचलिया, संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव एस. टी. गडदे, संचालक अर्चना ठाकूर, ऍड. विनायक कोळी, भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या सानवी देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या आणि अशा स्पर्धांचा कायदेशीर ज्ञान वृद्धीकरणात व भविष्यकाळातील कायदेशीर व्यावसायिकांच्या घडवण्यात असलेला महत्त्वावर भर दिला. त्यांच्या समर्थनामुळे आणि मार्गदर्शनामुळे या कार्यक्रमाची यशस्विता निश्चित झाली आणि स्पर्धकांना त्यांच्या कायदेशीर प्रवासात पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली. " शास्त्रार्थ " – राष्ट्रीय स्तराचे मूट कोर्ट स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा भाग असून त्याची सुरुवात आजपासून झाली. त्यात एक प्रतिष्ठित कायदेशीर तज्ञांचा पॅनेल नियुक्त करण्यात आला. सकाळच्या शिफ्टमध्ये न्यायाधीश म्हणून एड्वोकेट स्वप्निल पाटील, एड्वोकेट अश्विन सिंग, एड्वोकेट अश्विन आडवानी, एड्वोकेट वैभव घाटके, एड्वोकेट निलेश बागडे, एड्वोकेट सोनिया पवार, एड्वोकेट इंद्रजीत भोसले, आणि एड्वोकेट भक्ती दळवी यांचा समावेश होता. दुपारच्या शिफ्टमध्ये न्यायाधीश म्हणून एड्वोकेट सुजय, एड्वोकेट लक्षणा पाटील, एड्वोकेट पूजा भोसले, एड्वोकेट सागर पसपोहे, एड्वोकेट शुभांगी झीटे, एड्वोकेट धनिष्ठा कावले, एड्वोकेट मोहनसिंग राजपूत, आणि एड्वोकेट हृषिकेश वाणी यांचा समावेश होता. यावेळी एक "रिसर्चर टेस्ट" देखील घेतली गेली, ज्यामुळे सहभागींना एक शैक्षणिक आव्हान दिले गेले आणि त्यांना आगामी कडक फेऱ्यांसाठी योग्यरीत्या तयार करण्यात आले. ही स्पर्धा कायदेशीर मानांना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. देशभरातील सहभागी आपल्या वकिली कौशल्यांचे प्रदर्शन करत असून, "शास्त्रार्थ " युवा वकिलांना अमूल्य न्यायालयीन अनुभव मिळवण्याचा, कायदेशीर व्यावसायिकांशी नेटवर्किंग करण्याची आणि राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा दाखवण्याची एक उत्तम संधी ठरली आहे. या स्पर्धेने कायद्याच्या क्षेत्रात शिकण्याची, संवाद साधण्याची आणि व्यावसायिक विकासाची भरपूर संधी दिली आहे.

## वंदनाताई कसारे यांना महाराष्ट्र अँटी करप्शन बोर्ड तर्फे समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**दैनिक युवक आधार**
**सतिश लोखंडे**
**वार्ताहर सभाजीनगर .**

वंदनाताई कसारे ह्या सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी असून गेल्या पंधरा वर्षापासून सावित्रीबाई फुले महीला एकात्म समाज मंडळ संस्था मध्ये किशोर वयीन मुलींसाठी समुपदेशक म्हणून काम करत आहे. महीला व मुलींवर अत्याचार होत असेल तर तो दामिनी पथक व पोलीस प्रशासनाच्या मदतीने सोडविणे तसेच शाळा , महाविद्यालये येथे मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार आणि समाजाची कायम भुमिका असली पाहिजे या विषयी व्याख्यान देण्याचे काम देखील करत आहे. त्यांच्या या कामाची दखल घेऊन. त्यांना 2020 या वर्षीचा सबल उत्कर्ष नवी दिल्ली तर्फे बेटी बचाव बेटी पढाव पुरस्कार देण्यात आला 200 छत्रपती संभाजी नगर महाराष्ट्र येथील मटा सन्मान देण्यात आला 2024 चा विदर्भ गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यासोबतच दिव्य मराठी. महाराष्ट्र टाईम या पेपरमध्ये यांच्या कार्याचे सविस्तर लेख देखील आले आहेत या सर्व कामाचा आढावा आणि माहिती मिळाल्यामुळे 19 मार्च 2025 रोजी अँटी करप्शन बोर्ड रजिस्टर दिल्ली तर्फे महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार त्यांना देण्यात आला त्यांच्या निस्वार्थी समाजसेवा समाजप्रती असलेले बांधिलकी समाजातील वंचित घटकाला सर्व प्रकारची मदत मिळावी यासाठी चे प्रामाणिक प्रयत्न त्या करत राहतात. त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे असेच कार्य




त्यांच्या हातून घडत राहो आणि समाजाने त्यांच्याकडून प्रेरणा घेत राहा या त्यांना शुभेच्छा देण्यात आला तसेच भारतीय वंचित जनसंवाद महाराष्ट्र राज्य या सामाजिक क्षेत्रातील संघटनेच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

## कंपनी विरोधात कंत्राटी कामगारांनी पुकारले आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

तळोजा एमआयडीसी येथील केम्सपॅक केमिकल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील कंत्राटी कामगारांनी कंपनीच्या समोर आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. थकीत वेतन मिळावे आणि नोकरीमध्ये सामावून घेण्याची मागणी त्यांनी केली आहे. केम्सपॅक कंपनीत 104 कामगार कंत्राटी पद्धतीने काम करत होते. त्यातील काही कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यात आले. त्यानंतर येथील कंत्राटदाराला बदलून कंपनीने नवीन कंत्राटदाराची नेमणूक केली. त्यामुळे येथील स्थानिक कामगार कामापासून वंचित राहिले. कंपनीत नाक्यावरील कामगार आणून काम केले जात असल्याचे या कामगारांनी सांगितले. या संदर्भात डिसेंबर 2024 मध्ये कामगार उपायुक्त, पनवेल यांच्याकडे झालेल्या सुनावणीत कंपनी टप्प्याटप्प्याने कामगारांना नोकरीमध्ये सामावून घेईल असे सांगितले होते. मात्र त्यांनी तसे केले नाही. त्यामुळे या कामगारांनी 22 मार्चपासून आमरण उपोषण पुकारले आहे. थकीत वेतन मिळावे तसेच पुन्हा नोकरीवर सामावून घ्यावे या मागण्यांसाठी हे उपोषण चालू ठेवण्यात आले आहे.




## मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघात ; डंपरची उभ्या ट्रकला मागून धडक ; चालक फरार

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

नागोठणे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ऐनघर गावाजवळ शुक्रवार 21 मार्च रोजी पहाटे 3.30 वाजण्याच्या सुमारास डंपरची ट्रकला मागून झालेल्या धडकेत दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून डंपर चालक फरार झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार 21 मार्च रोजी पहाटेच्या सुमारास माणगाव बाजूकडुन मुंबई बाजूकडे जाणारा डंपर क्र. MH 48 AG 9015 हा साधारण 3.30 वाजण्याच्या सुमारास नागोठणे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ऐनघर गावाजवळील हॉटेल बिजली जवळ आला असता डंपर चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करीत गाडी भरधाव वेगात चालवून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रक क्रं. MH 12 KP 8027 ला मागून जोरदार ठोकर मारली. या अपघातानंतर डंपर चालक फरार झाला असून अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. सदरील अपघाताची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात झाली असून पुढील तपास सहा. पो. नि .सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस हवालदार सरोज सावंत करीत आहेत.




## ट्रेलरची अलिबाग – नागोठणे लालपरीला धडक ; बसचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नागोठणे – पेझारी रस्त्यावरील मौजे आंबेघर गावाजवळील वळणावर शुक्रवार 21 मार्च रोजी सकाळी 9.40 वाजण्याच्या सुमारास ट्रेलरने अलिबाग – नागोठणे या एस.टी. (लालपरी) बसला दिलेल्या धडकेत एस.टी. बसचे नुकसान झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार 21 मार्च रोजी अलिबाग कडून नागठणे बाजूकडे येणारी अलिबाग – नागोठणे ही एस.टी.बस क्र. MH 20 BL 3706 ही साधारण सकाळी 9.40 वाजण्याच्या सुमारास नागोठणे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आंबेघर गावाच्या पुढील वळणावर आली असता ; त्याच दरम्यान समोरून येणारा ट्रेलर क्रं. MH 46 CU 4099 च्या चालकाने ट्रेलर रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, अतिवेगात चालवून ट्रेलरमध्ये असलेले लोखंडी पिलर हे ट्रेलरच्या बाहेरील बाजूस असल्याने त्याची एस.टी. बसच्या पुढील बाजूस धडक बसली. या धडकेत बसचे नुकसान झाले असून सदरील अपघाताची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात झाली असून पुढील तपास सहा. पो. नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ए.एस.आय. संदेश सानप करीत आहेत.





# बॉश इंडिया फाऊंडेशनतर्फे खेड तालुक्यातील 15 शाळांना खेळाच्या साहित्याचे वाटप.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ देवेंद्र ओव्हाळ**

**खेड पुणे.** चाकण, दि. 21 मार्च 2025 - खेड तालुक्यातील चाकण एमआयडीसी येथील बॉश इंडिया फाऊंडेशनने आपल्या सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत (CSR) तालुक्यातील 15 शाळांना खेळाचे साहित्य वाटप केले. या उपक्रमात पाईट, कडूस, कनेरसर, राजगुरुनगर, किवळे, कुरकुंडी, कोहिंडे बुद्रुक, पाळू, आंबोली, डेहणे, वाडा, चास, वेताळे, वाशेरे आदी गावांतील शाळांचा समावेश होता. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळणार असून, शाळांच्या प्रगतीत मोलाची भर पडणार आहे. बॉश इंडिया फाऊंडेशनने चेस, खो-खो, बॅडमिंटन, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, फुटबॉल, व्हॉलीबॉल, लाँग जंप, क्रिकेट, लेझिम,यांसह जिल्हा आणि राज्यस्तरीय खेळांसाठी आवश्यक असणारे जवळजवळ सर्व प्रकारचे साहित्य या शाळांना उपलब्ध करून दिले आहे. या खेळाच्या साहित्यामुळे विद्यार्थी नियमितपणे खेळ खेळू शकतील आणि त्यांचे शारीरिक स्वास्थ्य सुधारेल. खेळांमुळे विद्यार्थ्यांची चपळता, ताकद आणि सहनशक्ती वाढण्यास मदत होईल. त्याचबरोबर, सामूहिक खेळांमुळे टीमवर्क, नेतृत्व आणि सहकार्याची भावना विकसित होईल, असे बॉश इंडिया फाऊंडेशनच्या प्रतिनिधींनी सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा तणाव कमी होऊन त्यांची एकाग्रता वाढेल, ज्याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या अभ्यासावर होईल. बॉश इंडिया फाऊंडेशनने पुरवलेले खेळाचे साहित्य उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांचा शाळेप्रती उत्साह वाढण्याची शक्यता असून, यामुळे शालेय उपस्थितीत सुधारणा होईल आणि गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. शिवाय, या साहित्याच्या जोरावर शाळांना स्थानिक, जिल्हा किंवा राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होता येणार असून, विद्यार्थ्यांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. या वाटप सोहळ्याला बॉश इंडिया फाऊंडेशनचे प्रतिनिधी रोहित बलुरे, माजी उपसरपंच जयसिंग दरेकर, युवक संघटक युवराज बंदावणे, सेवा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष किसनराव गारगोटे, विश्वजीत दांगट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. "शाळेसाठी दान केलेले खेळाचे साहित्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देईल आणि शाळेच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देईल," असे बॉश इंडिया फाऊंडेशनचे प्रतिनिधी रोहित बलुरे यांनी यावेळी सांगितले. हा उपक्रम शाळा आणि विद्यार्थ्यांसाठी एक पुढचे पाऊल ठरेल, अशी आशा उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. खेळाच्या माध्यमातून शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा बॉश इंडिया फाऊंडेशनचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.




## पनवेलमधील 290 दिवे सौरऊर्जेवर परिसर लखलखणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

: पनवेल महापालिका क्षेत्रातील महामार्गांवरील बसथांबे, शौचालये, उद्यान आणि विविध स्मशानभूमी तसेच देहरंग धरणाच्या परिसरात पालिकेने सौरउर्जेवरील 290 दिवे लावल्यामुळे हा परिसर उजळून निघाला आहे. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानंतर जिल्हा नगरोत्थान निधीतून हा खर्च करण्यात आला आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये 17 हजार विजेचे पोल आहेत. त्यावर 24 हजार एलईडीचे वीजदिवे सुरू आहेत. 2023 - 2024 या आर्थिक वर्षात पनवेल पालिकेच्या वीज विभागाला जिल्हा नगरोत्थान निधीतून दोन कोटी 10 लाखांचा निधी सौर उर्जेवरील दिव्यांसाठी मिळाला होता. सौर ऊर्जेवरील दिवे शहरातील महामार्गांवरील मुख्य बसथांब्यावर बसविल्यामुळे शहरातील वीज गायब झाल्यानंतर रात्रीच्या वेळीस महिला प्रवाशांना त्याचा मोठा आधार होणार आहे. तसेच महामार्गांवरील शौचालयांचा परिसरात प्रकाश कायम राहील. स्मशानभूमीत या दिव्यांचा मोठा आधार मिळू शकेल. जिल्हा नगरोत्थान निधीतून 260 दिव्यांमध्ये सहा मीटर उंचीच्या पोलवर 45 वॅटचे 210 दिवे आणि आठ मीटर उंचीच्या पोलवर 60 वॅटचे पन्नास दिवे लावण्यात आले. पाच वर्षांची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधित कंत्राटदार कंपनीची आहे. देहरंग धरणाचा परिसरही 45 वॅटच्या तीस दिव्यांनी उजळला आहे.

# पाच आमदारांनी घेतली शपथ

## महायुतीच्या सदस्यांची बिनविरोध निवड



**मुंबई** : महायुतीच्या नवनियुक्त पाच आमदारांनी शुक्रवारी शपथ घेतली. बिनविरोध निवडून आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनिर्वाचित पाचही आमदारांची सभागृहाला ओळख करून दिली.

भाजपचे दादाराव केचे, संजय केणेकर, संदीप जोशी तर राष्ट्रवादीचे (अजित पवार) संजय खोडके आणि शिवसेनेचे (शिंदे गट) चंद्रकांत रघुवंशी या महायुतीच्या पाच जणांचा शपथविधी पार पडला. विधान परिषदेचे पाच सदस्य आमदारपदी विधानसभेत निवडून गेले. त्यामुळे या पाच जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर केली होती. या पोटनिवडणुकीसाठी ६ अर्ज आले. यापैकी ५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. तर एका अपक्ष उमेदवाराने आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र आणि नोटरी दिली नसल्याने त्याचा अर्ज बाद करण्यात आला. २० तारखेपर्यंत अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख होती. विरोधकांनी अपेक्षित संख्येअभावी अर्ज सादर न केल्याने महायुतीच्या उमेदवारांची बिनविरोध निवड झाली.

विधान परिषदेच्या पाच जागा रिक्त झाल्याने त्या रिक्त जागांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार होती. २७ मार्चला मतदान आणि त्यादिवशी सायंकाळी मतमोजणी कार्यक्रम ठरला होता. मात्र विरोधी पक्षांकडून संख्याबळाअभावी उमेदवारी अर्ज न दाखल केल्याने परिषदेची निवडणूक बिनविरोध झाली आणि शुक्रवारी नवनिर्वाचित पाचही आमदारांचा शपथविधी झाला.

# रमजान सन,रमजान ईद

**दैनिक युवक आधार-** रमजान महिना हा मुसलमान लोकांचा पवित्र महिना आहे.

या महिन्याची सुर्वात चंद्राची पहिली तारीख पासून, चंद्राची कोर पाहून सुरू होते ,यालाच चांदरात म्हणतात. रमजान चा चंद्र दिसला की " (रोजे) उपवास ठेवायला मुस्लिम लोक सुरवात करतात.

मध्यरात्री पासून ते सकाळच्या 5. ते 5.30 पर्यंत जेवणाची परवानगी आहे . दिवस निघाल्यापासून ते दिवस मावळेपर्यंत काहीही न खाण्याची परवानगी नसते .१४ ते १७ तास काहीही ना खाता पिता हे उपवासाचे पालन करावे लागते.

रमजान महिन्याचे उपवास सरासरी ३० दिवसाचे असतात. संपूर्ण महिना उपवासाचे पालन करावे लागते हे उपवास ठेवणे खूप कठीण असते ६ ते १० वर्षाचे मुलं, मुली उपवास ठेवायला सूर्वात करतात ,यालाच रोजाखुलाई असे म्हणतात.

रमजान महिन्याचे उपवास ठेवणे हे मुस्लिम समाजातील ५ कर्तव्यामधून ३ क्रमांकाचे कर्तव्य आहे त्याचा पालन करावाच लागतो . फक्त आजारी आणि वयोवृध्द लोकांना या उपासाची सवलत,माफी आहे .त्या मोबदल्यात या लोकांना फिदिया, कोणत्याही गरिबाला १महिन्याचा राशन,किराणा घेऊन द्यावा लागतो. सकाळच्या जेवणाला सहेरी आणि दिवस मावल्यवर जे जेवण करतात त्याला इफ्तार असे म्हणतात .या रमजान महिन्यात ५ वेळेचे नमाज पठण करणे,खोटे नं बोलणे , शिव्या शाप न देने असे अनेक नियमांचा पालन कठोरतेने केले जाते. हा महिना संपल्यावर नवीन चंद्र दिसल्यावर दुसऱ्या दिवशी रमजान ईद साजरी केली जाते सर्व मुस्लिम बांधव नवीन कपडे घेतात व ईदगाह मध्ये सकाळी ७ ते १० या वेळेत ईद ची नमाज अदा,पठण करतात . नमाज झाल्यावर सर्व एकमेकांना शुभेच्छा देतात. गळाभेट करतात. सर्व आपसातील भांडण ,तंटे ,राग, नाराजगी दूर करून भेटतात. मुस्लिम लोक नमाज झाल्यावर सर्व नातेवाईकांना, शेजाऱ्यांना ,हिंदू व सर्व धर्म यांना शुरखुर्मा प्यायला व फराळ व जेवण करायला बोलावतात. रमजान ईदला अरबी मध्ये दुसरे नाव ईद-उल-फित्र असेही आहे कारण ईदला जाण्यापूर्वी सर्व मुस्लिम लोक गरीब लोकांना गहूचा दान देतात प्रत्येक व्यक्तीला नमाज

अदा करण्यापूर्वी कमीत कमी अडीच किलो दान द्यावेच लागते यालाच फितरा असे म्हणतात. रमजान हा सण वर्षातून एकदा येतो. मुस्लिम समाज हा वर्षाची गिनती गणना चंद्रावर चंद्र आधारित आहे त्यामुळे प्रत्येक सणाचा काळ व वेळ व दिवस बदलत राहतो. रमजान व प्रत्येक सण चंद्रमा चक्राप्रमाणे बदलत राहतील हे सण तिन्ही ऋतूत येतात. रमजान मध्येच कुराण प्रकट झाला. कुराण हा मुसलमान लोकांचा व सर्व मानवांचा पवित्र धर्मग्रंथ आहे. जो त्यांचा ईश्वर अल्लाद्वारे त्यांचे अंतिम प्रेक्षित पैगंबर मोहम्मद सल्लल्लाहु अलै वसल्लम यांना देण्यात आला आहे. कुराण संपूर्ण मानवतेसाठी आहे सर्वांना मार्गदर्शक आहे. रमजान महिना, रमजान हे शांतता ,सत्यता, त्यागाचे व स्वर्ग प्राप्तीचे, नरकापासून सुटकेचे ,पापापासून मुक्तीचे प्रतीक आहे.

लेखक..



मोहम्मद शेख शोएब शेख युसुफ
एम. ए बी एड
गुलशन ए उस्मान उर्दू स्कूल,
छत्रपती संभाजीनगर

# गुढीपाड्यानिमित्त साखरेच्या हाराची मागणी वाढली दोन गृहउद्योग पुरवतात मुरुड शहरात साखरेचे हार

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी मोहम्मद पिंजारी**

गुढीपाडवा अवघ्या काही दिवसांवर आला आहे मराठी नववर्षाला प्रत्येक घरात गुढी उभारली जाते या दिवशी साखरेच्या हारांना (गाठींना) विशेष महत्त्व आहे मुरुड शहरात साखरगाठी बनवण्याचे दोन गृहउद्योग आहेत येथील साखरेच्या आहारांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे या माध्यमातून सुमारे......लाखांची उलाढाल होते मुरुड शहरात मागील अनेक वर्षापासून साखरगाठींचा व्यवसाय करणारे कुटुंब आहेत त्यांनी मुरुड शहराचे एक वेगळे मार्केट तयार केले आहे व्यापाऱ्यांकडून आलेल्या ऑर्डरनुसार हे साखरेचे हार तयार करून देतात परंतु हा व्यवसाय



काही दिवसांचा असल्यामुळे टाईम लिमिट पाळावी लागते या कालावधीत अनेक जणांना रोजगार उपलब्ध होतो एका चाचणीला २५-३० किलो साखरेचा उपयोग करण्यात येतो असे साखरेचे हार करणाऱ्या व्यवसायिकांनी सांगितले आहे ते म्हणाले की एका वेळेच्या चाचणीला २५-३० किलो साखर टाकली जाते त्याला अर्धा तास गरम केल्यानंतर त्याचा पाक तयार होतो तो साखरेचा पाक सागवान लाकडापासून बनवलेल्या साच्यात ओतला जातो थंड झाल्यावर साखर गाठ तयार होतात

**एक उद्योग दिवसाला बनवतो १००-१५० किलो साखरेचे हार..**

शहरात साखरगाठी बनवण्याचे दोन गृह उद्योग चालतात एक गृह उद्योग दिवसाला शंभर ते दिडशे किलो साखरेचे हार तयार करतात या साखरेच्या हारांची मार्केटमध्ये 70 रुपये किलोने विक्री होते हा व्यवसाय वीस दिवस चालतो एक ग्रह उद्योग वीस दिवसात दोन हजार किलो साखरेचे हार बनवतो यासाठी चारते पाच महिला व दोन पुरुष असे एकूण सात जण काम करतात चौकट

**हारांची मागणी वाढत चालली....... व्यावसायिक**

मागील अनेक वर्षांपासून आम्ही गृह उद्योगाच्या माध्यमातून साखरेच्या हारांचा (गाठी) व्यवसाय करत आहोत दरवर्षी साखरगाठींची मागणी वाढत चालली असून आम्ही वीस दिवसांमध्ये साधारणतः दोन हजार किलो पेक्षा जास्त साखरेचे हार तयार करून विक्री करतो यातून फायदा चांगला होतो

........ साधू भोई - व्यावसायिक

# जसं पेराल तसं ऊगवेल

रमजान महिन्याचा तिसरा आणि शेवटचा भाग काल सायंकाळपासून सुरु झाला आहे.याला जहन्नुम पासून मुक्तीचा काळ संबोधले जाते. रमजानचा हा शेवटचा भाग खूप महत्वाचा आहे.या दहा दिवसात दररोज रात्री अधिक काळ प्रार्थना करुन अल्लाहची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे. या महिन्याच्या शेवटच्या भागात लैलतुल कद्र ही एक अशी रात्र आहे कि या रात्री केलेल्या प्रार्थनेचे पुण्य हे हजार महिन्यांच्या पुण्या समान आहे.पण ती रात्र नेमकी कोणती हे अल्लाहने गुप्त ठेवले आहे. शेवटच्या खंडातील २१ते २९ तारखा दरम्यान विषम संख्येतील ती एक रात्र आहे.पण ती रात्र नेमकी कोणती हा प्रश्न आहे म्हणून दहाच्या दहा रात्री जर आपण थोडी अधिक प्रार्थना केली तर बिघड़लं कुठं?या रात्रीत एक रुपया दान केला तर हजार महिने रुपये दान केल्या समान आहे.दोन रकात नफील नमाज आदा केली तर हजार महिन्याची दोन रकात आदा केल्यासारखे आहे.म्हणजे एकदा एक कार्य केले तर हजार महिने केल्यासारखे पुण्य प्राप्त होत असल्याने दहा रात्री प्रार्थना करणारा निश्चितच अधिक पुण्य प्राप्तीस पात्र ठरतो.अल्लाहने आपल्याला दिलेले जीवन सत्कारणी लावण्यासाठी आपण सद्वर्तन,सद् विचार, सदाचाराने जगणे आवश्यक आहे.आपण जे इतरांना दयाल ते तशीच फेड करतील म्हणून जीवनात प्रत्येक कार्य करतांना मनात हा विचार असावा.व्यापार, व्यवहार,वर्तन या सर्व बाबतीत काळजी घेणे




आवश्यक आहे. व्यवहारात खोटेपणा, फसवणूक असे प्रकार करू नये,कारण ज्याला फसवले जाते त्याची हाय किंवा तळतळाट ज्याला बददुआ म्हणतात ती चांगली नसते.व्यवहारात सचोटी नसल्यास माणसे जीवनातून उठतात. दिलेले शब्द पाळणे व आपल्यावर केलेल्या उपकारांची जाणिव ठेवणे आवश्यक आहे. कृतज्ञता बाळगल्याने आत्मशांती प्राप्त होते तर कृतघ्नपणा केल्याने मनोशांती भंग पावते. जे पेराल ते उगवेल या न्यायाने आपण केलेल्या कामाचा तसाच मोबदला आपणास मिळत असतो.यासाठी ईश्वराशी नाते जोडुन सत्य आणि सचोटीची कास धरल्यास जीवन यशस्वी होते.एका राजाने आदल्या दिवशी घोषणा केली कि उद्या सकाळी दरबारात येऊन कोणतीही व्यक्ति ज्या वस्तूला हात लावील ती त्याची होईल.हे ऐकून प्रत्येक जण विचार करु लागला कि मी सोने, चांदी,नाणे,महाल घेईल एक खूपच दरिद्री माणूस दरबारात आला व त्याने राजालाच हात लावला. आता राजाच त्याचा झाल्याने राजाची प्रत्येक वस्तू त्याची झाली. याप्रमाणे या सृष्टीचा जो राजा आहे तो ईश्वर/ अल्लाह,त्याला आपले केले तर सर्व जग आपले होणार आहे.तेव्हा त्याला आपले करण्याचा जो काही मार्ग आहे तो आपण अंगीकारल्यास सर्व काही आपले होईल हे ध्यानात घ्यावे. ( क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, पाटोदा येथे माता-पालक मेळावा उत्साहपूर्ण वातारणात संपन्न.

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा शहरातील प्रसिद्ध लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल मध्ये बुधवार दिनांक १९मार्च २०२५ रोजी भव्य माता-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पालकांचा मोठा प्रतिसाद लाभला होता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध चर्चासत्रे आणि मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली. मेळाव्याची सुरुवात, कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी श्रीमती अंजली गोरे मॅडम, सीमा वालेवाडीकर मॅडम, प्राचार्य पठाण सर, शालेय पर्यवेक्षिका सीमा माळी मॅडम यांनी दिप प्रज्वलनाने केली. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अंजली गोरे मॅडम, सीमा वालेवाडीकर, मुख्याध्यापक पठाण सर, उज्वला मॅडम, वसुंधरा मॅडम, पालक आणि शिक्षणतज्ज्ञ मान्यवर, पालक प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापकांनी पालकांचे स्वागत करत शाळेच्या प्रगती विषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी शाळा कोणत्या योजना राबवत आहे या विषयी पालकांना माहिती देण्यात आली. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसिक आणि नैतिक विकासावर भर देण्याच्या दृष्टीने अनेक उपयुक्त सत्रे



घेण्यात आली. शिक्षणतज्ज्ञांनी आधुनिक शिक्षणपद्धती, तंत्रज्ञानाचा वापर, तसेच विद्यार्थी व पालक यांच्यातील संवाद महत्त्वाचा कसा आहे या वर मार्गदर्शन केले. पालकांनी आपल्या मुलांच्या भविष्यासाठी शाळेच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले. पालक आणि शिक्षकांमध्ये उत्स्फूर्त संवाद साधण्यात आला पालकांनी आपले प्रश्न विचारले आणि शिक्षकांनी त्यांची उत्तरे दिली. काही पालकांनी आपल्या अनुभवांची माहिती दिली आणि शाळेच्या उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देखील विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. गीत, नृत्य, नाटिका आणि वक्तृत्व स्पर्धांमधून त्यांनी आपली कला सादर केली. ज्यामुळे संपूर्ण शालेय परिसर आनंदमय वातावरणाने भरून गेले होते. या वेळी शाळेतील मुलांनी आपली मनोगते व्यक्त केली. आणि चिमुकल्यांनी बहारदार गीतावर नृत्य सादर केली. मेळाव्याच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शनपर भाषण केले आणि सर्व पालकांना आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. पालक आणि शिक्षकांच्या सहकार्यातूनच विद्यार्थ्यांचा समग्र विकास होऊ शकतो असा सकारात्मक संदेश या मेळाव्यातून देण्यात आला. शेवटी शाळेच्या व्यवस्थापनाच्या वतीने उपस्थितांचे आभार मानण्यात आले. उपस्थितांनी हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी आणि माहितीपूर्ण असल्याचे सांगितले. या उत्साहवर्धक माता-पालक मेळाव्यामुळे पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील बंध अधिक दृढ झाला आहे असे मत सर्वांनी व्यक्त केले.

# शासकीय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी केले प्रदूषण जनजागृती




**अहिल्यानगर:** दि. २० मार्च रोजी शासकीय तंत्रनिकेतन अहिल्यानगरच्या प्रथम वर्ष यंत्र अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी आवाजामुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत जनजागृती मोहिमेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज चौकात नागरिकांची जनजागृती करून आवाज प्रदूषणाबाबत फेरीचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम महाराष्ट्र उन्नती अभियानांतर्गत आयोजित करण्यात आले. मनुष्य १२० डेसिबल पर्यंत आवाज सहन करू शकतो. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध वाहन चालकांना गाडीच्या हॉर्नमुळे नागरिकांना कोणकोणते आजार होऊ शकतात याबाबत माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वस्तिक चौक अशी जनजागृती यात्रा काढून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. सदर अभियानास नगरकरांनी चांगला प्रतिसाद दिला तसेच विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# सखी व दिव्यांग मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा.



**शेवगाव:** तालुक्यातील विधानसभा निवडणुकीत सखी मतदान केंद्र (केंद्र क्र. ६८, सामनगाव) आणि दिव्यांग मतदान केंद्र (केंद्र क्र. ४१, तळणी) येथे उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा तहसीलदार प्रशांत सांगडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सखी मतदान केंद्राच्या मार्गदर्शक शैलजा राऊळ, रोहिनी प्रभाकर साबळे, कीर्ती शेषराव पालवे, सविता सर्जे राव बुधवंत, भीमाबाई शिवनाथ भिसे, रिता रंगनाथ गांगर्डे, रेणुका हरिभाऊ घोडके आणि उषा संजय साखळकर यांचा गौरव करण्यात आला. तसेच दिव्यांग मतदान केंद्रावर सेवा बजावलेल्या गणेश रमेश पुरुषोत्तम, संतोष शेषराव सातपुते, रामनाथ काशिनाथ कारगुडे, अशोक मीना जाधव आणि शिवाजी बाबुराव गायकवाड यांचा प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आला. कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, पाथर्डीचे तहसीलदार उद्धव नाईक, गटविकास अधिकारी अजित बांगर, पाथर्डी गटविकास अधिकारी कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच नायब तहसीलदार गौरी गट्टे, नायब तहसीलदार दीपक कारखिले, निलेश वाघमारे, राजेंद्र बकरे, कारखिले साहेब, स्विप सहाय्यक व शिक्षक बँकेचे व्हाइस चेअरमन रमेश गोरे आणि महसूल सहाय्यक सुरेश बर्डे उपस्थित होते. या सत्कार सोहळ्यात मतदान प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले.

# ३० मार्चला प्रज्ञाशोध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार गौरव

**अहिल्यानगर :**प्रज्ञाशोध परीक्षा २०२५परीक्षेतील गुणवत्ता यादीत स्थान पटकविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ रविवार दि. ३०मार्च रोजी सकाळी १०वाजता केडगाव, पुणे रोड येथील निशा लॉन्स मध्ये आयोजित करण्यात आला आहे. सदर परीक्षा १९ जानेवारी रोजी जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात आली होती. या मध्ये शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. इयत्ता ४ थी, ५ वी, ७वी, ८ वी करिता मराठी व इंग्रजी माध्यमातून या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. मराठी माध्यमाच्या गुणवत्ता यादीत अकराव्या व इंग्रजी माध्यमाच्या एक ते पाच स्थानापर्यंत असलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. सर्व इयत्ताचे प्रथम तीन क्रमांकासाठी प्रमाणपत्र गौरव चिन्ह व रोख बक्षीस देण्यात येणार आहे. या परीक्षेच्या निकालासह गुणवत्ता यादी प्रकाशित झाली असून, संबंधित विद्यार्थी, पालक, शिक्षक व मुख्याध्यापक यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी ु.ींरिहाशवपरसरअॅ.ळप या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांचा गौरव समारंभास उपस्थित रहावे. प.पू.डॉ. हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान व विद्या प्रतिष्ठान (महा.) व्डरा संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, केडगाव डरा आयोजित अहिल्यानगर प्रज्ञाशोध परीक्षेचे गेल्या ३४ वर्षापासून यशस्वी आयोजन करण्यात येते. या परीक्षेची विश्वासार्हतेमुळे दिवसेंदिवस विद्यार्थी संख्या वाढत आहे. या कार्यक्रमात बालकाच्या शैक्षणिक वाटचालीसंबंधी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन दिले जाणार आहे. संबंधित पालक व शिक्षकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन परीक्षेचे संचालक व परीक्षा नियंत्रकांनी केले आहे.

# वैदू समाजाच्या प्रगतीसाठी संघटन गरजेचे : डॉ. विश्वासराव आरोटे



**पाथर्डी :** वैदू समाजाला महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक रचनेत मोलाचे स्थान आहे. कोणतेही लग्नकार्य असो, उत्सव असो किंवा सार्वजनिक कार्यक्रम असो, वैदू समाजातील बांधवांची उपस्थिती ही आमच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असते. वैदू समाजाने आपले संघटन अधिक मजबूत करणे गरजेचे आहे. यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजाच्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचेल.असे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस आणि डॉ. विश्वासराव आरोटे यांनी व्यक्त केले. मढी येथील पवित्र गोरखनाथ समाधी स्थळी नुकताच एक विशेष कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरून आलेल्या विविध समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. समाजातील उल्लेखनीय कार्य करणार्या तसेच विविध उच्च पदांवर निवड झालेल्या मान्यवरांना शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आरोटे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

पोलीस निरीक्षक ,आदर्श पुरस्कार प्राप्त अधिकारी दशरथ हटकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना समाजाच्या एकत्रितपणाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, समाजाशिवाय कोणीही मोठा नाही, आपण समाजाशी बांधील राहूनच पुढे जाऊ शकतो. जर आपण सर्वजण एकत्र आलो, तर आपल्या सहकार्याच्या जोरावर महामंडळात आपल्याला हक्काचे स्थान मिळू शकते. या एकतेसाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी विचारांची देवाणघेवाण होणे गरजेचे आहे.

# नोटिसा काढल्या पण बजावणार कधी ?
## जिल्हा परिषदेच्या कारवाई बाबत शंका

**श्रीगोंदा** :तालुक्यातील उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोन्नती अभियान अंतर्गत लाखो रुपयाचा अपहार झाल्याची बाब निदर्शनास आल्यावर जिल्हा परिषदेकडून नोटिसा काढल्या गेल्या पण त्या बजावणार कधी यावर मोठ्या प्रमाणात शंका व्यक्त केली जात आहे. ेंदा तालुक्यातील उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोन्नती अभियान अंतर्गत म्हणजे बचत गटाच्या माध्यमातून लाखो रुपयाचा अपहार झाल्याची बाब चर्चेला आल्यावर त्याची सखोल चौकशी करून त्याचा अहवाल जिल्हा परिषदेला सादर करण्यात आला, त्यानुसार उपमुख्यकार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनी अहवालाचे वाचन करत अहवालानुसार दोषी वाटणाऱ्या महिलांना नोटिसा काढून खुलासा मागविला . चार दिवस उलटले तरीही अश्या कोणत्याही प्रकारची नोटीस अद्यापही श्रीगोंद्यात कोणालाही मिळाली नसल्याची माहिती मिळाली आहे नोटिसा निघणार आहेत अशी माहिती घोटाळ्यात सामील असणाऱ्या महिलांना मिळताच त्यांनी या नोटिसा सर्व सामान्य महिलांपर्यंत पोहचनार नाहीत यासाठी मोठ्या प्रमाणात मायक्रोप्लानींग केल्याची चर्चा ऐकण्यास मिळाली होती मात्र उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांनी नोटिसा काढण्याचे काम चालू आहे असे सांगून चार दिवस उलटले तरीही आजपर्यंत श्रीगोंदा तालुक्यातील एकही बचत गटाच्या अध्यक्ष अथवा सचिव यासह ग्रामसंघ प्रभागसंघ, सीआरपी यासह इतर कोणालाही याबाबत अद्यापही नोटीस मिळाली नाही ,त्यामुळे जिल्हा परिषदेच्या कारवाई बाबत मोठ्या प्रमाणात शंका कुशंका व्यक्त केल्या जात आहेत .नोटिसा तयार आहेत सही झाल्यावर पाठवू - उपमुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद श्रीगोंदा तालुक्यातील बचत गटाच्या घोटाळ्यात मुख्य दोषी महिलांना नोटिसा काढून खुलासा मागविला जाणार आहे त्यासाठी नोटिसा तयार आहेत, फक्त त्यावर मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सही बाकी आहे सही झाली कि नोटिसा पाठवल्या जाणार आहेत अशी माहिती उपमुख्याधिकारी राहुल शेळके यांनी माध्यम प्रतिनिधी यांच्याशी बोलताना सांगितले आहे. ाकीच्या महिलांना गटविकास अधिकारी नोटीस देणार !

घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार महिलांना जिल्हा परिषदेच्या नोटिसा मिळणार असून ग्रामसंघ आणि बचत गट अध्यक्ष सचिव व इतर महिलांना गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा याच्या मार्फ़त नोटिसा देऊन खुलासा मागविला जाणार असून त्याचेवर पण कारवाईची टांगती तलवार असल्याची माहिती मिळत आहे .

# कुकडीच्या आवर्तनापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांची जबाबदारी कोण स्वीकारणार? लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचा सवाल

**लिंपणगाव** श्रीगोंदा तालुक्यात कुकडीच्या आवर्तनापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांची जबाबदारी कोण स्वीकारणार? असा सवाल कुकडी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांमधून व्यक्त केला जात आहे. दरम्यान मागील दहा दिवसांपूर्वी श्रीगोंदा तालुक्यात १३२ मायनर मधून कुकडीचे ७० क्युसेसने आवर्तन सोडण्यात आले होते. आवर्तन अत्यंत कमी दाबाने सोडल्यामुळे आवर्तनातून चोराचीवाडी; लिंपणगाव कार्यक्षेत्रात फक्त पाटच ओले झाले. असा दावा शेतकऱ्यांमधून केला जात आहे. त्यामुळे वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांची जबाबदारी स्वीकारणार कोण? अशी आर्त हाक वंचित शेतकऱ्यांनी केली आहे. कुकडी लाभक्षेत्राचे दुसरे हंगामाचे आवर्तन सध्या सुरू आहे. करमाळा; कर्जत! कोळवडी येथील टेल कडून भरणी झाल्यानंतर श्रीगोंदा तालुक्यात कुकडीचे आवर्तन सोडण्यात येते. सदरचे आवर्तन १३२ मायनर मधून श्रीगोंद्याच्या काही भागाला पाणी सोडले. आवर्तनाचा कालावधीही अंतिम टप्प्यात आहे. अधिकाऱ्यांचे योग्य नियोजन नसल्यामुळे अनेक शेतकरी या आवर्तनापासून वंचित राहिले. त्यामुळे रब्बी हंगामातील कोट्यावधीची पिके केवळ कुकडीच्या एका आवर्तनामुळे जळून गेलेले आहेत. या जळून गेलेल्या पिकांची जबाबदारी घेणार कोण? असा सवाल कुकडी लाभ क्षेत्रातील शेतकरी अशोक वाल्हेकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. उन्हाच्या तीव्रतेमुळे आहे; पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत आहे. शेतकऱ्यांना कुकडीचे दुसरे हंगामाची आवर्तन मिळेल ही मोठी अपेक्षा होती. दुसऱ्या हंगामाचे आवर्तन हे अत्यंत महत्त्वाचे होते. परंतु पाणी आले आणि गेले शेतकऱ्यांचे फक्त पाटच ओले झाले. संबंधित कुकडीच्या अधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांनी तक्रार करूनही आवर्तनाची दखल घेतली नाही. त्यामुळे हाता तोंडाशी आलेली रब्बी हंगामाची पिके वाया गेली. नुकसान तर झालीच परंतु या नुकसानीची भरपाई कोण देणार? असा सवाल देखील या लाभ क्षेत्रातील वंचित शेतकऱ्यांकडून केला जात आहे. तालुक्याच्या आमदारांनाही शेतकऱ्यांनी या संदर्भात आवर्तनाबाबत माहिती दिली. परंतु ठोस निर्णय झाला नाहीं. त्यामुळे पाण्याबाबत न्याय नेमका मागायचा कुठे? असा सवाल देखील शेतकऱ्यांमधून केला जात आहे. पाणी उशाला मात्र कोरड घशाला अशी अवस्था श्रीगोंदा तालुक्यातील कुकडी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांची निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार कुकडीच्या धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा आहे. चालू उन्हाळी हंगामात पाण्याचे योग्य वाटप होईल; या अपेक्षावर शेतकऱ्यांनी पीक हाती लागेपर्यंत मेहनत घेतली. त्यामुळे कुकडीच्या आवर्तनातून पिके वाचतील. परंतु कुकडीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्येक चारीला बारा तासाची शेतकऱ्यांना मुदत दिली. परंतु बारा तासात फक्त शेतकऱ्यांचे पाटच ओले झाले. अशा परिस्थितीत पाणी न मिळालेल्या शेतकऱ्यांनी आता कुकडीच्या अधिकाऱ्यांवरोधात संघर्षाची भूमिका घेतली आहे. चालू आवर्तनातून श्रीगोंदे तालुक्यातील कुकडी लाभ क्षेत्रात शेतकऱ्यांना तातडीने आवर्तन मिळावे यासाठी काँग्रेसचे नेते घनश्याम अण्णा शेलार यांच्या नेतृत्वाखाली २४ व २५ मार्च रोजी धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या पाणी प्रश्न बाबत तालुक्याचे लोकप्रतिनिधी व कुकडीचे अधिकारी आवर्तनाबाबत कोणता निर्णय घेतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# श्रीक्षेत्र बुवाजी बाबा देवस्थान दिंडीचे

**टाकळी ढोकेश्वर-** येथे श्री क्षेत्र बुवाजी बाबा देवस्थान डिग्रस दिंडीचे आगमन झाले . यावेळी टाकळी ढोकेश्वर व परिसरातील गावच्या ग्रामस्थांनी या दिंडीचे दर्शन घेतले . या पायी दिंडी सोहळ्याचे हे ३६ वे वर्ष असून या दींडीत वर्षानुवर्षे लोकसंख्येत वाढ होत आहे . हि दिंडी महंत श्री उमाजी अहिलाजी पुणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी निघत असून . या दिंडीत जवळ पास ३ हजार भाविकांचा सहभाग असून त्यात तरुण वर्ग जास्त सहभागी झाले आहेत . हि दिंडी गुढीपाडव्याला बाबरी देवस्थान रुई याठिकाणी पोहचून त्या ठिकाणी गुढी उभारून या दिंडीची सांगता होणार आहे . ही दिंडी टाकळी ढोकेश्वर येथे आल्यानंतर या दिंडीचे स्वागत वडगाव सावताळ गाजदीपूर येथील ग्रामस्थांनी फटाक्याच्या आतिषबाजी व फुलांची उधळण करत केले आहे. यावेळी भजन, कीर्तन, असे विविध कार्यक्रम घेण्यात आले . यावेळी बाबुराव तीखोळे ,दत्तोबा तीखोळे, भिवा तीखोळे, अंकुश टेकले, खंडोजी तीखोळे, लालू तीखोळे, लक्ष्मण तीखोळे, नारायण तीखोळे, रामा तीखोळे, लिंबाजी तिखोले, धुळा तेखोले, च्यासह गाजिपूर व वावरत वाडा परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते आज टाकळी ढोकेश्वर येथे मुक्काम केल्यानंतर उद्या या दिंडीचे प्रस्थान पारनेर कडे करणार आहेत.



# फार्मर आयडी कार्डसाठी अहिल्यानगरजिल्हा राज्यात अव्वल; ५ लाख शेतकऱ्यांची नोंदणी

**अहिल्यानगर:** शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या अॅग्रीस्टॅक योजनेत अहिल्यानगर जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आला असून आतापर्यंत जिल्ह्यात ५ लाख १८ हजार ५८१ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. केंद्र व राज्य सरकारकडून शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांमधील गोंधळ कमी करण्यासाठी अॅग्रीस्टॅक योजना सुरू करण्यात आलेली आहे. जिल्हा प्रशासनाला १५ लाख २२ हजार ५८१शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत ५ लाख १८ हजार ५८१ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.जल्ह्यात ५ लाख ७३ हजार ९९० पीएम किसानचे लाभार्थी आहेत. यातील ९०.३५ टक्के शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार करण्यात आले आहे. शासकीय योजनांचा लाभमिळण्यासाठी 'अॅग्रीस्टॅक' या योजनेत नावनोंदणी करणे शेतकऱ्यांना अनिवार्य आहे. शेतकऱ्यांनी जवळच्या सीएससी सेंटरमध्ये फार्मर आयडीसाठी अर्ज करावेत. नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात येत आहेत. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी केल्यास कारवाई करण्यात येणार आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, कृषी विभाग यांत्रिकीकरण, थेट लाभहस्तांतरण, पीक कर्ज मिळवण्यासाठी ओळखपत्राचा उपयोग होणार आहे. फार्मर आयडीसाठी आवश्यक कागदपत्रे फार्मर आयडीसाठी आधार कार्ड, सात बारा उतारा गट क्रमांक, नमुना ८ अ खाते उतारा क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि लाभार्थी शेतकरी नोंदणीवेळी उपस्थित असणे आवश्यक आहे. तालुकानिहाय नोंदणी तालुका - नोंदणीश्रीगोंदा ४४,६८५ नगर ३४,९२२संगमनेर ५१,६६१जामखेड २६,७११ कर्जत ३८,१०२ पाथर्डी ३८,९१८ राहुरी ३८,८५८ नेवासा ५३,०८६शेवगाव ३८,८४८ कोपरगाव २६,७८६ पारनेर ४४,८९५ अकोले ३२,३७३ राहाता २६,०२९ श्रीरामपूर २२,७०७

# पाण्याअभावी फळबागा टिकवणे कठीण, शेतकरी चिंताग्रस्त, शासनाकडून उपाय योजना करण्याची गरज

**मिरी :** दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. शेतीसमोरील संकटही गडद होत चालले आहे. पाण्याअभावी फळबागा धोक्यात आल्या आहेत. पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना फळबागा वाचविण्यासाठी आटापीटा करावा लागत आहे. बोअरवेल, विहिरी कोरड्या पडल्यामुळे शेतकरी टँकरने पाणी पुरवठा करून फळबागा जगवत आहेत. टँकरचे पाणी खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांचा मोठा खर्च होत असून लाखमोलाच्या फळबागा वाचविण्यासाठी ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे प्रयत्न सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

अल्प पावसामुळे फळबागांवरही पाणीटंचाईचे संकट आले आहे. विहिरीतील पाणी तळाशी गेल्याने फळबागा कशा जगवाव्यात, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे हिरव्यागार दिसणाऱ्या बागा आता पाण्याअभावी जळताना पाहून शेतकरी हवालदिल झाले आहेत. संकटकाळातही काही शेतकरी विकतचे पाणी घेऊन फळबागा जगविण्यासाठी धडपड करीत आहेत. फळबागांसाठी टँकरचे पाणी विकत घेतले जात मोठी रक्कम मोजावी लागत आहेत. अनेक गावांमध्ये जानेवरी महिन्यापासूनच टँकरचे पाणी विकत घेऊन फळबागांना दिले जात आहे. एप्रिल व मे महिन्यात पाणीटंचाईचे चित्र अधिकच भीषण होण्याची शक्यता असल्याने याकाळात फळबागा जगवण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर असणार आहे.

पाथर्डी तालुक्यातील गेल्या अनेक वर्षांपासून चिचोंडी शिराळ, कोल्हार, डमाळवाडी, गीतेवाडी, लोहसर खांडगाव, भोसे, करंजी, सातवड या भागात वांबोरी चरीच्या माध्यमातुन वेळेत पाणी सुटायचे. त्यानुसार शेतकर्यांनी शेतातील फळबागांची लागवड केली होती.

यावर्षी चारीचे पाणी वेळेत न आल्याने अनेक वर्षांपासून फळबागा जपलेल्या जळून चालल्या आहेत. तसेच शेतकर् यांचां चारा करपून गेला आहे. तर पाण्याअभावी मका कडवळ अर्ध्यावर सोडून द्यावे लागले असल्याचे चित्र या भागात दिसत आहे. दरम्यान शेतकर्यांचे हाल होत असताना दुसरीकडे शासनाकडून काही उपाययोजना केल्या जात नसल्याने बळीराजा हतबल झाला आहे.

सध्या पाच हजार लिटरच्या लहान टँकरसाठी दिड ते दोन हजार रुपये शेतकर्यांना मोजावे लागत असून या पाण्यावर कशी तरी २००-३०० झाडे जगवत आहेत. सध्या तीव्र उन्हाळा जाणवत असून पाणी कमी पडत असल्याचे पाच ते सहा दिवसांनी पुन्हा पाणी द्यावे लागत असल्याने शेतकर्यांच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. फळबागा जगण्यासाठी पाणी विकत घेताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने बागा जगवणे अवघड झाले आहे.

**वांबोरी चारी चे पाणी पूर्ण दाबाने सोडावे....**

कशी करावी शेती, पाणी मिळत नाही, मशागतीचा खर्चही निघत नाही, वांबोरी चारीचे पाणी वेळेत व पुर्ण दाबाने सोडत नाहीत. सध्या पाणी नसल्याने फळबागा जळू लागल्या आहेत. फळबागा जगविण्यासाठी २ ते ३ हजार रुपये टँकरला मोजावे लागत आहेत. आता बँकेची कर्ज फेडायची कसे? चिंता परिसरातील शेतकर्यांना भेडसावत आहे. सध्या भीषण पाणी टंचाई भासत असून विकत पाणी घेऊन फळबागा जगवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. बागा जगविण्यासाठी शासनाने मदत करावी. वांबोरी चारीचे आवर्तन सोडावे अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

फळबागांची लागवड केल्यानंतर साधारणपणे पाचव्या वर्षापासून उत्पादन मिळू लागते. फळबागांची व्यवस्थित निगा राखली, तर २० वर्षे या फळबागांमधून उत्पादन मिळू शकते. मात्र, पाण्याअभावी फळबागा जळाल्यास फळबागेला जेवढी वर्षे झाली आहेत, तेवढी वर्षे शेतकरी मागे जातो. कारण प्रत्येकवेळी नव्याने फळबाग लागवड करण्याचा खर्च आवाक्याबाहेरचा असतो.

**राजेंद्र गीते (शेतकरी नेते)**

फळबागेतील ज्या झाडांना फळे लागली आहेत, त्यांना जास्त पाणी लागते. एक एकर क्षेत्रामध्ये असणाऱ्या सर्व झाडांना फळे लागली असतील, तर या क्षेत्राला आठवड्याला आठ ते दहा हजार रुपयांचे विकतचे पाणी द्यावे लागते. फळ नसणाऱ्या झाडांच्या पाण्याचा एक एकर क्षेत्रासाठी खर्च आठवड्याला दोन हजार रुपये एवढा आहे. टँकरने पाणी देण्याशिवाय आमच्यासमोर पर्याय नाही.

**-किरण ससे (संत्रा उत्पादक शेतकरी)**

**फळबागा कशा जगवाव्यात?** फळबागांना फटका पाण्याची गंभीर समस्या असलेल्या भागात टँकरने फळबागा जगवण्याची धडपड सुरू असते. यंदा तशीच वेळ आली आहे. फळबाग लागवडीसाठी सरकार प्रोत्साहन देत असून, लागवडीला अनुदान देतेय, मात्र लागवड केलेल्या बागा जगवण्यासाठी उपाययोजना करत नाही. पाणीटंचाईमुळे फळबागा जगवाव्यात कशा, असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना पडला आहे.

**- शशिकांत रणशिंग (संत्रा उत्पादक शेतकरी)**

दुष्काळामध्ये फळबागा जगविण्यासाठी काय करता येऊ शकते, यासाठी आम्ही जनजागृती करण्यावर भर देत आहोत. शेतकऱ्यांनी फळबागांना जैविक मल्चिंग, प्लास्टिक मल्चिंग करावे. झाडांच्या पानाची छाटणी करावी, जेणेकरून पाणी कमी लागेल. तसेच ज्यांच्याकडे पाण्याची सोय आहे, त्यांनी ठिंबक सिंचन करून पाण्याचे योग्य नियोजन करावे.

**- संकेत कराळे ( कृषी अधिकारी)**

# कॉपीमुक्त परीक्षा अभियान परिणामकारक ?

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी, बारावीच्या परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी राबवलेल्या कॉपीमुक्त अभियानामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दहावी आणि बारावी या दोन्ही परीक्षांतील गैरप्रकारांची संख्या घटली आहे. यंदा राज्यभरात दहावीच्या परीक्षेत ८९, तर बारावीच्या परीक्षेत ३६० गैरप्रकारांची नोंद झाली. राज्य मंडळाने नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी आणि बारावीची परीक्षा घेतली. या परीक्षेमध्ये गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबवण्यात आले. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्रांच्या परिसरात जिल्हा प्रशासनाकडून ड्रोनडरे परीक्षा केंद्रांची निगराणी, परीक्षा केंद्रांबाहेर दृक् श्राव्य चित्रीकरण, सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके, बैठ्या पथकांची नियुक्ती, परीक्षा केंद्रावर नियुक्त केंद्रसंचालक, पर्यवेक्षक, परीक्षेशी संबंधित सर्व घटकांची 'चेहरा पडताळणी व्यवस्थे'डरे (फेस रेगक्निशन) तपासणी, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे यांच्यावर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करणे, अशा विविध उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच, गैरप्रकार घडणाऱ्या शाळा, महाविद्यालयांतील परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्याचा इशाराही देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर राज्य मंडळाने संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षीची परीक्षा आणि यंदाच्या परीक्षेतील गैरप्रकारांच्या आकडेवारीची तुलना करता यंदा गैरप्रकारांची संख्या कमी झाल्याचे दिसते. गेल्या वर्षी दहावीच्या परीक्षेत २९९, तर यंदा ८९ गैरप्रकार नोंदवले गेले आहेत. गेल्या वर्षी बारावीच्या परीक्षेत ४५२, तर यंदा ३६० प्रकरणांची नोंद झाली आहे. दहावीच्या परीक्षेत २१०, तर बारावीच्या परीक्षेत ९२ गैरप्रकार कमी झाल्याचे दिसून येते.

# वडगावपीर येथे श्री पिरसाहेब यात्रा उत्सवाचे आयोजन

**लोणी धामणी** हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असलेल्या वडगावपीर (ता.आंबेगाव ) येथील श्री पिरसाहेब यात्रा उत्सव शनिवार (दि:२२) ते सोमवार (दि:२४ )असे तीन दिवस संपन्न होणार आहे. शनिवार ( दि :२२) रोजी सांयकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत संदल कार्यकम होणार असू या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हिंदू-मुस्लिम बांधव उपस्थित असतात असे हजरत दावल मलिक दर्गा शरिफ ट्रस्टिजच्या वतीने हनिक मुजावर यांनी सांगितले आहे. रविवार (दि:२३ ) रोजी सकाळी ८ वाजता देवास शेरणी व दंडवते व शेरणी वाटप तसेच सकाळी सात ते सायंकाळी सात वाजता बैलगाड्याच्या भव्य शर्यती संपन्न होणार आहेत. त्यासाठी गुरुवार (दि:२०)रोजी ९ ते १२ वाजता लकी ड्रॉ पध्दतीने टोकन काढले जातील. बैलगाड्यांसाठी एकूण इनाम ३,५१,९०० रुपये असून, प्रथम क्रमांकासाठी ७५,५५५ रुपये, द्वितीय क्रमाक-६५,५५५ रुपये, तृत्तीय क्रमाक-५५,५५५ रुपये, चतूर्थ क्रमाक-३५,५५५ रुपये, इना.तसेच सतत तीन वर्ष प्रथम येणाऱ्या गाड्यास (सन २०२४ ते २०२६) गाड्यास ५ दुचाकी किंवा रोख रक्कम रुपये ३,५१,००१ रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. तसेच आकर्षक गाडा बारीसाठी १५०१ रूपये बक्षिस ठेवले आहे. रविवार (दि:२३ एप्रिल ) रोजी रात्री ९ वाजता संगिताची राणी मंगला बनसोडे सोबत नितीनकुमार बनसोडे करवडीकर यांचा लोकनाटय तमाशाचा कार्यक्रम होईल. सोमवार (दि.२४) रोजी दुपारी ४ ते ७ वाजेपर्यंत भव्य कुस्त्यांचा जंगी आखाडा होईल.या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहाणार आहेत.या सर्व कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन समस्त ग्रामस्थ वडगावपीर-मांदळेवाडी,मुंबई,पुणे व शिवछत्रपती ग्रामविकास प्रतिष्ठान व सर्व ग्रामस्थ यांनी केले आहे.